सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

# महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७

(दिनांक २ मे १९९७ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XLI of 1987

# The Maharashtra Tax on Luxuries Act, 1987.

(As modified upto the 2nd May 1997)

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

# महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७.

(दिनांक २ मे १९९७ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XLI of 1987.

# The Maharashtra Tax on Luxuries Act, 1987.

(As modified upto the 2nd May 1997)

# महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | उद्देशिका. | |
| | कलमे. | |
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | १ |
| ३ | करभार व कर बसविणे | ५ |
| ३-अ | तंबाखूच्या व्यापाऱ्यावरील कराचा भार | ६ |
| ३-ब | तंबाखूच्या व्यापाऱ्यावर ऐषआराम कर बसविणे | ७ |
| ३-क | तंबाखूच्या व्यापाऱ्यांना विवक्षित कलमे लागू होणे | ८ |
| ४ | हॉटेलचालकाचे आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याचे कर भरण्याचे दायित्व | ८ |
| ५ | हॉटेलचालक आणि तंबाखूचा व्यापारी या नात्याने भागीदारी संस्थांचे दायित्व | ८ |
| ६ | कर देण्याच्या दायित्वासंबंधी तसेच विवक्षित बाबतीत कोणतीही शास्ती किंवा व्याज देण्याच्या दायित्वासंबंधी विशेष तरतूद | ८ |
| ७ | अधिनियमाखालील प्राधिकारी | ९ |
| ८ | नोंदणी | १० |
| ९ | नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरणीय नसणे | ११ |
| १० | कामधंदा इत्यादीमधील बदलासंबंधी माहिती पुरवणे | ११ |
| ११ | नोंदणी प्रमाणपत्र विवक्षित परिस्थितीत चालू राहणे | ११ |
| १२ | विवरणे | ११ |
| १३ | कराची आकारणी | ११ |
| १४ | कलम ६ अन्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे. | १३ |
| १५ | आकारणीतून सुटलेल्या, कमी आकारणी केलेल्या वगैरे उलाढालीची फेर- | १३ |
| १६ | विवक्षित बाबतीत शास्ती लादणे आणि व्याज आकारणे | १३ |
| १७ | विवक्षित तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती लादणे | १५ |
| १८ | कराचा भरणा | १६ |
| १९ | कर, इत्यादी पूर्ण रकमेत घेणे | १६ |
| २० | कराची वसुली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे करण्यासंबंधी विक्रीकर प्राधिकाऱ्याचे विशेष अधिकार. | १७ |
| २१ | वसुलीची खास पद्धत व वसुलीच्या विवक्षित कार्यवाह्या | १७ |
| २२ | सूट | १९ |
| २३ | अतिरिक्त प्रदानाचा परतावा | १९ |
| २३-अ | कराचा परतावा | २० |
| २४ | उशिरा परत केलेल्या रकमांवरील व्याज | २० |
| २५ | विवक्षित प्रकरणात परतावा रोखून ठेवण्याचा अधिकार | २० |

| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २६ | करापासून माफी | २१ |
| २७ | विवक्षित बाबतीत कर गोळा करण्यास मनाई | २१ |
| २८ | ग्राहकांना द्यावयाचे बिल किंवा रोखीचे टिपण | २१ |
| २९ | हिशेब | २१ |
| ३० | हिशेब व कागदपत्रे सादर करणे व त्यांची पाहणी करणे आणि परिवास्तूची झडती | २२ |
| ३१ | हॉटेलचालकाने आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याने आपल्या धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव जाहीर करणे | २२ |
| ३२ | आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार | २२ |
| ३३ | विवादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करणे | २३ |
| ३४ | आयुक्ताचे अधिकार | २३ |
| ३५ | विवक्षित कार्यवाहीस रोध | २४ |
| ३६ | अपिले | २४ |
| ३७ | अपीलयोग्य नसलेले आदेश | २५ |
| ३८ | पुनरीक्षण | २५ |
| ३९ | अपिलासाठी करण्यात आलेले अर्ज आणि अन्य विवक्षित अर्ज यांवरील न्यायालय फी. | २६ |
| ४० | मुदतमर्यादा अधिनियमाची कलमे ४, ५ व १२ लागू असणे. | २६ |
| ४१ | चुकांची दुरुस्ती | २६ |
| ४२ | अपराध व शास्ती | २६ |
| ४३ | कोणत्याही लोकसेवकाने माहिती उघड करणे | २८ |
| ४४ | कंपन्यांनी केलेले अपराध | ३० |
| ४५ | अपराधांचे अन्वेषण | ३० |
| ४६ | अपराध आपसात मिटवणे | ३१ |
| ४७ | कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार | ३१ |
| ४८ | कार्यवाहीत कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे हजर राहणे | ३१ |
| ४९ | कलम ७ अन्वये नेमलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे | ३२ |
| ५० | क्षतिपूर्ती | ३२ |
| ५१ | नियम करण्याचा अधिकार | ३२ |
| ५२ | सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याचे निरसन | ३३ |
| ५३ | व्यावृत्ती | ३३ |
| ५४ | अडचणी दूर करणे | ३४ |

# सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१[1]

[महाराष्ट्र [2][ ] ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७]

(दिनांक २ डिसेंबर १९८७ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली, संमती मिळाल्यावर दिनांक ७ डिसेंबर १९८७ च्या **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चारमध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)

या अधिनियमामध्ये पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (१-१-१९९२).*
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (२९-६-१९९२)*
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (४-९-१९९६)*
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

महाराष्ट्र राज्यातील [2][ * * * ] ऐषआराम सेवांवर कर आकारण्याशी संबंधित असलेला कायदा एकत्रित करणे व त्यामध्ये सुधारणा करणे यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी** [3][ * * * ] ऐषआराम सेवांवर कर आकारणे व तो वसूल करणे या बाबींशी संबंधित असलेला कायदा एकत्रित करणे व त्यामध्ये सुधारणा करणे व त्याच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र [4][ * * * ] ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७' असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(अ) "नियत दिनांक" या संज्ञेचा अर्थ कलम १ च्या पोटकलम (३) अन्वये राज्य शासनाने नियत केलेला दिनांक असा होतो,

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग पाच, इं. पृ. ४०८ ते ४४२ पहा.

२. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १२ अन्वये अधिनियमाच्या पूर्ण नावातील "हॉटेले व निवासगृहे यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या" हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

[१][(ब) '' व्यवसाय '' या संज्ञेमध्ये---

(एक) आर्थिक मोबदल्यात हॉटेलचालकाने निवासी जागा पुरविण्याचे काम आणि अशाप्रकारे निवासी जागा पुरविण्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक किंवा त्यास सहाय्यभूत असलेली कोणतीही अन्य सेवा; [२][ * * * ],

(दोन) विधि संस्थापित असलेल्या किंवा विधि संस्थापित नसलेल्या क्लबमध्ये कोणत्याही सेवेच्या स्वरुपात किंवा तिचा भाग म्हणून अथवा अन्य कोणत्याही रीतीने अन्नपदार्थ किंवा मानवी वापरासाठी असलेली कोणतीही अन्य वस्तू किंवा कोणतेही पेय (मग ते मादक असो किंवा नसो) असलेल्या मालांचा केला जाणारा पुरवठा किंवा सेवा ही रोख रक्कम, विलंबित प्रदान यांच्या मोबदल्यात किंवा इतर किंमती मोबदल्यात केला जात असेल त्या बाबतीत असा पुरवठा किंवा सेवा;

[३][(तीन) तंबाखू पुरविण्याचे काम],

यांचा समावेश होतो;

मग असे काम, इतर सेवा किंवा पुरवठा हा लाभ अथवा नफा मिळविण्याच्या हेतूने केला जात असो किंवा नसो अथवा असे काम, इतर सेवा किंवा पुरवठा यातून कोणताही लाभ अथवा नफा उपार्जित होत असो किंवा नसो; ]

[४][(ब-१) '' क्लब '' या संज्ञेमध्ये विधि संस्थापित असलेल्या आणि विधि संस्थापित नसलेल्या अशा दोन्ही व्यक्ती संघांचा-मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो--समावेश होतो;]

(क) '' आयुक्त '' या संज्ञेचा अर्थ या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ऐषआराम कर आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती असा होतो व यामध्ये, कलम ७ अन्वये कोणत्याही ऐषआराम कर अपर आयुक्ताची नियुक्ती करण्यात आली असल्यास, त्याचाही समावेश होतो;

(ड) हॉटेलात पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांच्या संबंधात '' सवलतीचा दर '' या संज्ञेचा अर्थ अशा ऐषआराम सेवेसाठी हॉटेल संचालकाने निश्चित केलेल्या नेहमीच्या दरापेक्षा कमी असलेला किंवा कोणत्याही शासकीय प्राधिकरणाने किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी असलेला दर असा होतो;

[५][(ड-१) '' पात्रता प्रमाणपत्र '' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने, पर्यटनासाठी प्रोत्साहनांची सामूहिक योजना, १९९३ या अन्वये दिलेले प्रमाणपत्र असा होतो;

(ड-२) '' पात्र युनिट '' या संज्ञेचा अर्थ ज्याच्या संबंधात पात्रता प्रमाणपत्र देण्यात येईल ते युनिट असा होतो;]

[६][(ई) '' हॉटेल '' या संज्ञेमध्ये---

(एक) जेथे व्यावसायिकरीत्या निवासी जागा पुरविण्यात येते अशी निवासी जागा, क्लब, निवासगृह, पांथगृह, सार्वजनिक गृह (पब्लिक हाऊस) अथवा इमारत किंवा इमारतीचा भाग; आणि

---

१. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३७ अन्वये मूळ पोटकलम (ब) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५४(१) द्वारे '' आणि '' हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५४(१) द्वारे हा उपखंड समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १५(२) अन्वये मूळ खंड (ब-१) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५४(२) द्वारे हे उपखंड समाविष्ट करण्यात आले व ते १ ऑक्टोबर १९९३ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

६. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३७ (३) अन्वये मूळ खंड (ई) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(दोन) जेथे कोणत्याही सेवेच्या स्वरुपात किंवा तिचा भाग म्हणून किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्य रीतीने अन्नपदार्थ किंवा मानवी वापरासाठी असलेली कोणतीही अन्य वस्तू किंवा कोणतेही पेय (मग ते मादक असो वा नसो) असलेल्या मालाचा रोख रक्कम, विलंबित प्रदान यांच्या मोबदल्यात अथवा इतर किंमती मोबदल्यात पुरवठा केला जातो किंवा सेवा दिली जाते असा क्लब;

यांचा समावेश होतो;]

(फ) '' हॉटेलचालक '' या संज्ञेचा अर्थ, हॉटेलचा मालक असा होतो व त्यामध्ये त्यावेळी त्या हॉटेलच्या व्यवस्थापनाची प्रभारी असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो;

[१][(ग) ' हॉटेलात पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवा ' या संज्ञेचा अर्थ,––

(एक) वातानुकूलन, दूरध्वनी, टेलिव्हिजन, रेडिओ, संगीत, करमणूक, जादा खाटा व यासारख्या इतर सेवा यांबाबतच्या आकारांसह ज्यांचा दर किंवा आकार दररोज प्रति व्यक्ती किंवा प्रति सदस्य [२][दोनशे रुपये किंवा त्यापेक्षा अधिक] असेल अशा हॉटेलात पुरविण्यात येणाऱ्या निवासव्यवस्था व इतर सेवा; आणि

(दोन) क्लबमध्ये कोणत्याही सेवेच्या स्वरुपात किंवा तिचा भाग म्हणून अथवा कोणत्याही प्रकारच्या अन्य रीतीने, अन्नपदार्थ किंवा मानवी वापरासाठी असलेली कोणतीही अन्य वस्तू किंवा कोणतेही पेय (मग ते मादक असो किंवा नसो) असलेल्या मालाचा केला जाणारा कोणताही पुरवठा हा रोख रक्कम, विलंबित प्रदान यांच्या मोबदल्यात किंवा इतर किंमती मोबदल्यात केला जात असेल त्याबाबतीत असा पुरवठा;]

असा होतो;

(ह) '' व्यक्ती '' या संज्ञेमध्ये कोणतीही [३][कंपनी, क्लब] किंवा संघटना किंवा व्यक्तीनिकाय यांचा– मग ती विधिसंस्थापित असो वा नसो–व तसेच हिंदू अविभक्त कुटुंब, भागीदारी संस्था, स्थानिक प्राधिकरण, राज्य शासन व केंद्र शासन यांचा समावेश होतो;

(आय) '' कामधंद्याचे ठिकाण '' या संज्ञेमध्ये [४][एखाद्या व्यक्तीकडून] आपल्या कामधंद्याच्या प्रयोजनासाठी वापरात असेल असे कार्यालय किंवा इतर कोणतीही जागा किंवा [४][ती] जेथे आपली लेखा पुस्तके ठेवीत असेल अशी जागा, यांचा समावेश होतो;

(ज) '' विहित '' या संज्ञेचा अर्थ या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात आलेले असा होतो;

[५][(के) '' जमा रकमा '' या संज्ञेचा अर्थ––

(एक) हॉटेल चालकाच्या बाबतीत, हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या कोणत्याही ऐषआराम सेवेदाखल हॉटेलचालकास किंवा त्याच्या एजंटास मिळालेली किंवा मिळावयाची किंमती मोबदल्याची रक्कम; आणि

(दोन) तंबाखूच्या व्यापाऱ्याच्या बाबतीत,––

(अ) त्याने विक्रीच्या स्वरुपात केलेल्या तंबाखूच्या पुरवठ्याच्या संबंधात, अशाप्रकारे विक्री करण्यात आलेल्या तंबाखूच्या संबंधात त्याच्या बटवड्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी त्याने केलेल्या

---

१. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ३७ (४) द्वारे मूळ खंड (ग) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ३५ द्वारे ' पांचशे रुपये किंवा त्यापेक्षा अधिक ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ३७ (५) द्वारे '' कंपनी '' या शब्दाऐवजी '' कंपनी, क्लब '' हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम १५ (अ) द्वारे '' हॉटेलचालक '' व '' तो '' या मजकुराऐवजी अनुक्रमे '' एखादी व्यक्ती '' व '' ती '' हे शब्द दाखल करण्यात आले.

५. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५४ (४) द्वारे मूळ खंड (के) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

कोणत्याही गोष्टीसाठी आकारण्यात आलेली कोणतीही रक्कम आणि वाहतुकीच्या विम्याच्या खर्चाव्यतिरिक्त कोणत्याही प्राथमिक किंवा नंतरच्या आवेष्टनाची किंमत स्वतंत्रपणे आकारण्यात आली असेल तर ती किंमत यासह त्याला मिळालेली किंवा मिळावयाची किंमती मोबदल्याची रक्कम; असा होतो; आणि

(ब) त्याने विक्रीव्यतिरिक्त अन्य स्वरुपात केलेल्या तंबाखूच्या पुरवठ्याच्या संबंधात, असा तंबाखू ज्या सामान्य किंमतीस विकण्यात येतो ती सामान्य किंमत आणि '' सामान्य किंमत '' या संज्ञेला केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४ याच्या कलम ४ मध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला आहे तोच अर्थ असेल;]; १९४४ चा १.

[१][(ल) '' नोंदणीकृत हॉटेलचालक '' किंवा '' नोंदणीकृत तंबाखूचा व्यापारी '' या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आलेला हॉटेलचालक किंवा यथास्थिति तंबाखूचा व्यापारी असा होतो;];

(म) '' नियम '' या संज्ञेचा अर्थ या अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम असा होतो;

(न) '' राज्य '' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र राज्य असा होतो;

(ओ) '' कर '' या संज्ञेचा अर्थ या अधिनियमाअन्वये [२][ * * *] ऐषआराम सेवांवर आकारण्यात आलेला कर असा होतो;

(२) [३][(ओ-१) '' तंबाखू '' या संज्ञेचा अर्थ केंद्रीय उत्पादनशुल्क प्रशुल्क अधिनियम, १९८५ याच्या टीपांमध्ये आणि प्रकरण २४ मधील तक्त्यामध्ये केलेल्या वर्णनाप्रमाणे असलेला, न बनवलेला आणि बनवलेला तंबाखू, असा होतो; १९८६ चा ५.

**स्पष्टीकरण.**——या खंडाच्या प्रयोजनांसाठी,——

(अ) न बनवलेला तंबाखू, या संज्ञेचा अर्थ, ब्रँड नाव असलेला, न बनवलेला तंबाखू;

(ब) बनवलेला तंबाखू, या संज्ञेमध्ये विड्यांचा समावेश होत नाही;

[४][(क) न बनवलेला आणि बनवलेला तंबाखू, या संज्ञेमध्ये प्रति किलोग्रॅम रु. १५० पेक्षा अधिक नसेल अशा किंमतीस विकल्या जाणाऱ्या जर्दाचा आणि तपकिरीचा समावेश होणार नाही;]

(ओ-२) '' तंबाखूचा व्यापारी '' या संज्ञेचा अर्थ——

(एक) विक्रीद्वारे किंवा अन्य रीतीने तंबाखूचा पुरवठा करणारा उत्पादक असा होतो आणि यामध्ये, कामधंद्याच्या प्रयोजनासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीकडून तंबाखू बनवून घेणाऱ्या--मग ते काम उक्ते काम म्हणून करवून घेतले जात असो किंवा नसो——कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो; परंतु त्यामध्ये, कोणत्याही टप्प्यामध्ये त्या तंबाखूवर कोणताही स्वामित्वाधिकार प्राप्त करून न घेता फक्त उक्त्या कामाच्या तत्वावर तंबाखू बनवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होत नाही;

(दोन) काम धंद्याच्या प्रयोजनासाठी राज्यामध्ये तंबाखू आणणारी किंवा आणण्याची व्यवस्था करणारी अथवा राज्याबाहेरच्या कोणत्याही ठिकाणाहून जिच्याकडे कोणताही तंबाखू पाठविण्यात येतो आणि जी विक्रीद्वारे किंवा अन्य रीतीने अशा तंबाखूचा पुरवठा करते अशी कोणतीही व्यक्ती असा होतो;

(तीन) राज्यातील एका ठिकाणाहून राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी विक्रीद्वारे किंवा अन्य रीतीने तंबाखूचा पुरवठा करणारी कोणतीही व्यक्ती असा होतो;

(चार) जी कोणतीही व्यक्ती ब्रँड नावाखालील न बनविलेला तंबाखू विकत घेत नाही किंवा अन्य प्रकारे मिळवत नाही परंतु अशा न बनविलेल्या तंबाखूचा ब्रँड नावाखाली सीलबंद पात्रामधून विक्रीद्वारे किंवा अन्य रीतीने पुरवठा करते ती व्यक्ती असा होतो:——,

**स्पष्टीकरण.**——शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की,——

(१) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला जो शेतकरी केवळ, स्वतः कसत असलेल्या जमिनीमध्ये पिकवलेल्या, न बनवलेल्या तंबाखूचा पुरवठा ब्रँड नाव न वापरता करतो--मग असा पुरवठा सीलबंद पात्रामधून केलेला असो वा नसो--तो शेतकरी; १९५९ चा मुंबई ५१.

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५४(५) द्वारे मूळ खंड (ल) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम १५(५) द्वारे हे शब्द वगळण्यात आले.

३. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५४ (६) द्वारे खंड (ओ) नंतर हा खंड दाखल करणयात आला.

४. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ९ याच्या कलम ४६ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(२) जी व्यक्ती केवळ, न बनवलेल्या तंबाखूचा ब्रँड नाव न वापरता पुरवठा करते—मग असा पुरवठा सीलबंद पात्रामधून केलेला असो वा नसो—ती व्यक्ती; आणि

(३) उप-खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती नसणारी जी व्यक्ती केवळ, खरेदीद्वारे किंवा अन्य रीतीने, नोंदणीकृत तंबाखू व्यापाऱ्याकडून असा तंबाखू मिळविते ती व्यक्ती,

या खंडाच्या प्रयोजनांसाठी तंबाखूचा व्यापारी असल्याचे समजण्यात येणार नाही;];

[१][(प) '' जमा रकमांची उलाढाल '' या संज्ञेचा अर्थ—

(एक) हॉटेलचालकाच्या बाबतीत, एखाद्या ठराविक कालावधीत हॉटेलातून पुरविण्यात आलेल्या ऐषआराम सेवांच्या संबंधात हॉटेलचालकाला किंवा त्याच्या एजंटाला मिळालेल्या किंवा मिळावयाच्या किंमती मोबदल्याच्या रकमांची एकुणात; आणि

(दोन) तंबाखूच्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, पुरवठ्याच्या संबंधात—मग असा पुरवठा विक्रीद्वारे करण्यात आलेला असो किंवा अन्य रीतीने करण्यात आलेला असो—ठराविक कालावधीत तंबाखू व्यापाऱ्याला मिळालेल्या रकमांची एकुणात, असा होतो;]

(क्यू) '' वर्ष '' या संज्ञेचा अर्थ—

(एक) वित्तीय वर्ष, किंवा

(दोन) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ कोणत्याही विशिष्ट [२][नोंदणीकृत हॉटेलचालकाच्या किंवा यथास्थिति, नोंदणीकृत तंबाखू व्यापाऱ्याच्या] संबंधात [२][हॉटेलचालकाचे किंवा तंबाखू व्यापाऱ्याचे] लेखे लेखापुस्तकामध्ये सामान्यतः ज्या वर्षाचा संदर्भ देऊन ठेवण्यात येतात ते वर्ष;

असा होतो.

**३.** (१) या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून हॉटेलचालकाच्या जमा रकमेच्या उलाढालीवर कर बसविण्यात येईल. करभार व कर बसविणे.

(२) [३][कलम २, खंड (ग), उपखंड (एक) च्या कक्षेत येणाऱ्या ऐषआराम सेवांच्या संबंधात] जमा रकमांच्या उलाढालीवर पुढील दरांनी कर बसविण्यात येईल.

| | |
|---|---|
| [४][(अ) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकार प्रतिदिन प्रतिव्यक्ती [५][दोनशे रुपयांहून कमी नसेल] त्या बाबतीत— | काही नाही. |
| (ब) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकार [६][प्रतिदिन प्रतिव्यक्ती [७][दोनशे रुपयांहून] अधिक असेल परंतु बाराशे रुपयांहून अधिक नसेल] त्या बाबतीत. | जमा रकमेच्या अशा उलाढालीच्या ४ टक्के. |
| (क) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकार प्रतिदिन प्रतिव्यक्ती बाराशे रुपयांहून अधिक असेल त्या बाबतीत : | जमा रकमेच्या अशा उलाढालीच्या १० टक्के.] |

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५४ (७) द्वारे मूळ खंड (प) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५४ (८) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ३८(१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५५ द्वारे मूळ खंड (अ), (ब), (क) व (ड) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

५. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ३६ (अ) द्वारे '' पाचशे रुपयांहून कमी असेल '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९ याच्या कलम २२(२) द्वारे '' प्रतिदिन प्रतिव्यक्ती पाचशे रुपये किंवा त्याहून अधिक '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तो १ ऑक्टोबर १९९५ पासून घालण्यात आल्याचे मानण्यात येईल.

७. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ३६ (ब) द्वारे '' पाचशे रुपये '' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, आकार दैनिक तत्त्वावर किंवा प्रतिव्यक्ती न बसविता अन्य प्रकारे बसविण्यात येत असतील, त्याबाबतीत या कलमान्वये करदायित्व निर्धारित करण्यासाठी जेवढ्या कालावधीकरिता आकार बसविण्यात आलेला आहे असा, त्या जागेतील वास्तव्याचा एकूण कालावधी व प्रत्यक्षात वास्तव्य करणाऱ्या किंवा हॉटेलच्या नियमानुसार किंवा प्रथेनुसार त्या जागेत वास्तव्य करण्याची परवानगी असणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या यांच्या आधारे प्रतिदिन प्रतिव्यक्ती आकार त्या प्रमाणात निश्चित करण्यात येईल.

[1][(२-अ) कलम २, खंड (ग), उपखंड (दोन) च्या कक्षेत येणाऱ्या ऐषआराम सेवांच्या संबंधात जमा रकमांच्या उलाढालीवर बारा टक्के या दराने कर बसविण्यात येईल.]

(३) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांकरिता आकारण्यात येणाऱ्या आकारांव्यतिरिक्त आणखी सेवा आकार हॉटेलचालकाकडून आकारण्यात व स्वतःकडे ठेवून घेण्यात येत असतील व ते कर्मचारीवर्गास दिले जात नसतील त्या बाबतीत, असे आकार हे हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकारांचाच भाग असल्याचे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही व्यक्तीस (हॉटेलचा कर्मचारी नसेल अशा) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवेवर कोणताही आकार बसविण्यात येत नसेल किंवा तो सवलतीच्या दराने बसविण्यात येत असेल त्या बाबतीत देखील, जणू काही हॉटेलचालकास अशा ऐषआराम सेवांसाठीच पूर्ण आकार देण्यात आला होता असे समजून पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी अशा ऐषआराम सेवांवर कर आकारण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.

(५) हॉटेलमध्ये विनिर्दिष्ट संख्येइतक्या व्यक्तींकरिता पुरविण्यात येणारी ऐषआराम सेवा विनिर्दिष्ट संख्येपेक्षा अधिक व्यक्तींकडून उपभोगण्यात येत असेल त्या बाबतीत, जादा व्यक्ती ही आपल्या आई-वडिलांबरोबर किंवा पालकांबरोबर खोलीमध्ये अधिवास करणारे मूल असेल आणि मुलाकरिता कोणताही स्वतंत्र आकार वसूल करण्यात येत नसेल त्याव्यतिरिक्त त्या जागेत सामावून घेतलेल्या जादा व्यक्तीकरिता बसविण्यात आलेल्या आकाराच्या संबंधात विनिर्दिष्ट संख्येइतक्या व्यक्तीकरिता पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांकरिता बसविण्यात आलेल्या कराव्यतिरिक्त स्वतंत्रपणे कर बसवण्यात व वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ " मूल " या संज्ञेचा अर्थ जिच्या वयास बारा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती असा होतो.

(६) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये ज्यांच्या विक्रीवर [2][हॉटेलचालकाने विक्रीकर अगोदरच भरला असेल] असे अन्नपदार्थ व पेये पुरवण्याबद्दल मिळणाऱ्या जमा रकमांवरील उलाढालीच्या संबंधात हा कर आकारण्यात येणार नाही व द्यावा लागणार नाही. १९५९ चा मुंबई ५१.

(७) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, हॉटेलचालकाने स्वतंत्ररीत्या वसूल केलेला कर हा, हॉटेलचालकाच्या जमा रकमेचा किंवा जमा रकमेच्या उलाढालीचा भाग असल्याचे मानण्यात येणार नाही.

तंबाखूच्या व्यापाऱ्यावरील कराचा भार.

[3][**३-अ.** (१) महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिवशी किंवा त्यानंतर (यात यापुढे ज्याचा निर्देश " प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे.):— १९९५ चा महा. १६.

(एक) ३१ मार्च १९९५ रोजी संपणाऱ्या वर्षी, किंवा

(दोन) १ एप्रिल १९९५ रोजी प्रारंभ होणाऱ्या वर्षी,

ज्याच्या जमा रकमांची उलाढाल अशा वर्षामध्ये रु. ५०,००० पेक्षा अधिक झालेली आहे असा प्रत्येक तंबाखू व्यापारी पोटकलम (३) अन्वये असे दायित्व समाप्त होईपर्यंत त्याच्या जमा रकमांच्या उलाढालीवर कर भरण्यास पात्र राहील :

---

१. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ३८(२) द्वारे पोटकलम (२) नंतर हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३२ याच्या कलम ३ द्वारे " विक्रीकर भरण्याचे दायित्व हॉटेलचालकावर असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५६ द्वारे कलम ३ नंतर कलमे ३-अ, ३-ब, ३-क समाविष्ट करण्यात आली.

परंतु, ज्यास उपखंड (एक) लागू होत नाही परंतु उपखंड (दोन) लागू होतो आणि प्रारंभाच्या दिनांकानंतर ज्याची जमा रकमांची उलाढाल प्रथमच रु. ५०,००० पेक्षा अधिक झाली असेल असा तंबाखूचा व्यापारी, १ एप्रिल १९९५ पासून संगणना करण्यात आलेल्या त्याच्या जमा रकमांची उलाढाल रु. ५०,००० पेक्षा वाढलेली नसेल त्यावेळेपर्यंतच्या जमा रकमांच्या संबंधात कर भरण्यास पात्र असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या वर्षानंतरचे वर्ष असलेल्या १ एप्रिलपासून प्रारंभ होणाऱ्या कोणत्याही वर्षामध्ये ज्यांच्या जमा रकमांची उलाढाल प्रथमच रु. ५०,००० पेक्षा अधिक होईल असा प्रत्येक तंबाखू व्यापारी पोटकलम (३) अन्वये असे दायित्व समाप्त होईपर्यंत उक्त दिनांकापासून या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र राहील :

परंतु, तंबाखूचा व्यापारी, उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरु होणाऱ्या आणि उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून संगणना करण्यात आलेल्या त्याच्या जमा रकमांची उलाढाल रु. ५०,००० पेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंतच्या कालावधीतील जमा रकमांच्या उलाढालीच्या संबंधात कर भरण्यास पात्र असणार नाही.

(३) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक तंबाखू व्यापारी, त्याची नोंदणी यथोचित रीत्या रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत अशाप्रकारे पात्र असण्याचे चालू राहील; आणि अशाप्रकारे नोंदणी रद्द करण्यात आल्यानंतर, आधीच बसविलेल्या किंवा बसवण्यायोग्य असलेल्या कराव्यतिरिक्त अन्य कर भरण्याचे त्याचे दायित्व त्याच्या जमा रकमांची उलाढाल प्रथमच रु. ५०,००० पेक्षा अधिक होईपर्यंत समाप्त होईल :

परंतु, तंबाखूचा व्यापारी पूर्वोक्तप्रमाणे पात्र असण्याचे ज्या वर्षामध्ये बंद होईल त्याच वर्षामध्ये पुन्हा कर भरण्यास पात्र होईल त्या बाबतीत, कर भरण्याचे दायित्व समाप्त होण्याच्या दिनांकास सुरू होऊन त्याची जमा रकमांची उलाढाल रु. ५०,००० पेक्षा अधिक होत नाही अशा दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीमधील जमा रकमांच्या उलाढालीच्या संबंधात कोणताही कर देय असणार नाही.

**३-ब.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, तंबाखू व्यापाऱ्याच्या जमा रकमांच्या उलाढालीवर कर बसविण्यात येईल. तंबाखूच्या व्यापाऱ्यावर ऐषआराम कर बसविणे.

(२) तंबाखूचा व्यापारी ज्या जमा रकमांच्या संबंधात, आयुक्ताची खात्री पटेल अशा प्रकारे,---

(अ) त्याने विक्रीद्वारे किंवा अन्य प्रकारे पुरवठा केलेल्या तंबाखूवर दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने अगोदरच कर भरलेला आहे असे सिद्ध करील आणि त्याच्या पुष्ट्यर्थ, असा भरणा केल्याचा पुरावा सादर करील;

(ब) दुसऱ्या राज्यात आंतरराज्यीय मालपाठवणी करून मग ती मालपाठवणी त्याच्या स्वतःकडे केलेली असो किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे केलेली असो--तंबाखूचा पुरवठा करण्यात आलेला आहे असे सिद्ध करील आणि त्याशिवाय अशा दाव्याच्या पुष्ट्यर्थ विहित करण्यात येईल असे प्रमाणपत्र मागणी करण्यात आल्यावर सादर करील; आणि

(क) आंतरराज्यीय व्यापार किंवा धंदा करताना किंवा भारताच्या राज्यक्षेत्राबाहेर निर्यात करताना विक्रीद्वारे तंबाखूचा पुरवठा करण्यात आलेला आहे असे सिद्ध करील आणि त्याच्या पुष्ट्यर्थ अशा विक्रीचा किंवा निर्यातीचा पुरावा सादर करील;

त्या जमा रकमा तंबाखू व्यापाऱ्याच्या जमा रकमांच्या उलाढालीमधून वजा केल्यानंतर अशा उलाढालीवर रुपयास पाच पैसे या दराने कर बसविण्यात येईल.

(३) पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ---

(अ) अशा विक्रीमुळे महाराष्ट्रातून, इतर कोणत्याही राज्यामध्ये तंबाखू हलवावा लागला असेल तर, आंतरराज्यीय व्यापाराच्या ओघात; आणि

(ब) विक्रीमुळे भारताच्या राज्यक्षेत्राबाहेर निर्यात झाली असेल तर अशा निर्यातीच्या ओघात, विक्री झालेली असल्याचे मानण्यात येईल.

तंबाखूच्या व्यापाऱ्यांना विवक्षित कलमे लागू होणे.

**३-क.** कलम ३, पोटकलम (७) आणि कलमे ८, ९ ते २१, २३, २४, २६ ते ३०, ३२ ते ३४, ३६, ३७ आणि ४३ यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी ज्याप्रमाणे हॉटेलचालकाला लागू होतात, त्याचप्रमाणे त्या योग्य त्या फेरफारांसह तंबाखूच्या व्यापाऱ्याला लागू होतील.]

हॉटेलचालकाचे [१][आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याचे] कर भरण्याचे दायित्व.

४. (१) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून या अधिनियमान्वये कर भरण्याचे दायित्व असलेल्या [१][प्रत्येक हॉटेलचालकाकडून आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याकडून] या अधिनियमाच्या तरतुदींनुसार आकारणीयोग्य असलेला किंवा असलेले कर देण्यात येतील.

(२) मालकाव्यतिरिक्त इतर व्यक्ती (तसेच भागशः मालकही) ही त्या वेळेपुरती त्या [२][कामधंद्याची] प्रभारी असेल तर अशी व्यक्ती व मालक (तसेच भागशः मालकही) संयुक्तपणे व पृथकपणे कर भरण्यास पात्र असतील.

हॉटेल चालक [३][आणि तंबाखूचा व्यापारी] या नात्याने भागीदारी संस्थांचे दायित्व.

**५.** एखादी भागीदारी संस्था [२][कामधंद्याची] मालक असेल, त्याची व्यवस्था पहात असेल किंवा तो चालवत असेल त्याबाबतीत ती भागीदारी संस्था व त्या भागीदारी संस्थेचा प्रत्येक भागीदार संयुक्तपणे व पृथकपणे कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, एखादा भागीदार भागीदारी संस्थेमधून निवृत्त झाला असेल त्याबाबतीत तो, त्याच्या निवृत्तीच्या वेळेपर्यंत भरण्यात न आलेला कोणताही कर, शास्ती व व्याज असल्यास त्याची रक्कम, आणि त्याच्या निवृत्तीच्या दिनांकापर्यंत देय असलेला कोणताही कर जरी निवृत्ती नंतरच्या दिनांकास कराची आकारणी करण्यात आली असली किंवा शास्ती व व्याज (कोणतेही असेल तर ते ) लादण्यात आले असले तरीही भरण्यास पात्र असेल.

कर देण्याच्या दायित्वासंबंधी तसेच विवक्षित बाबतीत कोणतीही शास्ती किंवा व्याज देण्याच्या दायित्वासंबंधी विशेष तरतूद.

**६.** (१) या अधिनियमान्वये कर देण्याचे दायित्व असलेला एखादा हॉटेलचालक मरण पावला असेल अशा बाबतीत,—

(अ) त्या हॉटेलचालकाकडून चालवण्यात येत असलेला कामधंदा त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत चालू ठेवण्यात आला असेल तर, असा कायदेशीर प्रतिनिधी किंवा अन्य व्यक्ती ही, अशा हॉटेलचालकाकडून या अधिनियमान्वये येणे असलेली कोणतीही शास्ती किंवा व्याज यासह तो कर मृत हॉटेलचालक ज्या रीतीने आणि ज्या मर्यादेपर्यंत देण्यास पात्र ठरला असता त्याच रीतीने आणि त्याच मर्यादेपर्यंत देण्यास पात्र असेल; किंवा

(ब) जर त्या हॉटेलचालकाकडून चालविण्यात येत असलेला धंदा त्याच्या मृत्यूपूर्वी किंवा मृत्यूनंतर बंद करण्यात आला असेल तर, मृत हॉटेलचालक मरण पावला नसता तर, ज्या रीतीने आणि ज्या मर्यादेपर्यंत कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) देण्यास तो पात्र ठरला असता, त्याच रीतीने आणि त्याच मर्यादेपर्यंत अशा हॉटेलचालकाकडून या अधिनियमान्वये येणे असलेला कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) मृत व्यक्तीच्या संपत्तीमधून देण्याचे दायित्व त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीवर असेल,—मग असा कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) त्याच्या मृत्यूपूर्वी आकारण्यात आलेले परंतु न भरलेले असो, किंवा त्याच्या मृत्यूनंतर आकारण्यात आलेले असो.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी '' कायदेशीर प्रतिनिधी '' या शब्दप्रयोगास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९८०, कलम २, खंड (११) मध्ये जो अर्थ देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

(२) या अधिनियमान्वये कर देण्याचे दायित्व असलेला हॉटेलचालक म्हणजे एक हिंदू अविभक्त कुटुंब असेल आणि संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेचे निरनिराळ्या कुटुंबियांमध्ये किंवा कुटुंबियांच्या गटांमध्ये विभाजन करण्यात आलेले असेल तेव्हा प्रत्येक कुटुंबीय व्यक्ती किंवा कुटुंबीय गट विभाजनाच्या वेळेपर्यंत या

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ कलम १७(१) व १८ (१) द्वारे '' हॉटेलची '' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५८ द्वारे समासटीपेतील हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अधिनियमान्वये हॉटेलचालकाकडून येणे असलेला कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असेल-मग असा कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) विभाजनापूर्वी आकारण्यात आलेले परंतु न भरलेले असो, किंवा विभाजनानंतर आकारण्यात आलेले असो.

(३) या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेला हॉटेलचालक हा एखादी भागीदारी संस्था असेल आणि ती विसर्जित करण्यात आली असेल तर अशा बाबतीत, भागीदार असलेली प्रत्येक व्यक्ती विसर्जनाच्या वेळेपर्यन्त या अधिनियमान्वये भागीदारी संस्थेकडून येणे असलेला कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) कलम ५ अन्वये ज्या मर्यादेपर्यन्त ती कर देण्यास पात्र असेल त्या मर्यादेपर्यन्त, देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असेल,--मग असा कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) अशा विसर्जनापूर्वी आकारण्यात आलेले परंतु देण्यात न आलेले असो किंवा अशा विसर्जनानंतर आकारण्यात आलेले असो.

(४) या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेला हॉटेलचालक त्याच्या धंद्याचे संपूर्णपणे किंवा अंशतः हस्तांतरण करील किंवा अन्यथा त्याची व्यवस्था लावील, किंवा त्याच्या मालकीमध्ये कोणताही बदल करील व त्याच्या परिणामी त्या धंद्यात किंवा त्याच्या भागात इतर कोणतीही व्यक्ती त्याच्या जागी येईल अशा बाबतीत, तो हॉटेलचालक व त्याच्या जागी येणारी व्यक्ती अशा हस्तांतरणाच्या, व्यवस्था लावण्याच्या किंवा मालकीत बदल घडवून आणण्याच्या वेळेपर्यन्त या अधिनियमान्वये त्या हॉटेलचालकाकडून येणे असलेला कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असेल,--मग असा कर (कोणतीही शास्ती किंवा व्याज यासह) अशा हस्तांतरणाच्या, व्यवस्था लावण्याच्या किंवा बदलाच्या पूर्वी आकारण्यात आलेला परंतु न भरलेला असो, किंवा त्यानंतर आकारण्यात आलेला असो.

(५) या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेला हॉटेलचालक---

(अ) ज्या पाल्याच्या वतीने पालक धंदा चालवित असेल अशा पाल्याचा पालक असेल, किंवा

(ब) विश्वस्त व्यवस्थेनुसार लाभाधिकाऱ्यासाठी तो धंदा चालवणारा विश्वस्त असेल अशाबाबतीत,

जर पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त करण्यात आली असेल तर, असा पाल्य किंवा यथास्थिति लाभाधिकारी असे पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त होण्याच्या वेळेपर्यन्त अशा हॉटेलचालकाकडून येणे असलेला कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) देण्यास जबाबदार असेल,--मग असा कर (तसेच कोणतीही शास्ती किंवा व्याज) असे पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त होण्यापूर्वी आकारण्यात आलेले परंतु न भरलेले असो, किंवा त्यानंतर आकारण्यात आलेले असो.

(६) या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेल्या हॉटेलचालकाच्या जागी पोटकलम (१), खंड (अ) किंवा पोटकलम (४) मध्ये वर्णन केलेल्या रीतीने कोणतीही व्यक्ती धंद्यात आली असेल त्याबाबतीत, अशी व्यक्ती, नोंदणी प्रमाणपत्र ती आधीच धारण करीत नसेल तर, धंद्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील.

अधिनियमाखालील प्राधिकारी.

७. (१) (अ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासन, संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी ऐषआराम सेवा कर आयुक्त म्हणून एक अधिकारी नियुक्त करील.

(ब) राज्य शासनाला,---

(एक) ऐषआराम सेवा कर अपर आयुक्त म्हणून एका किंवा अधिक अधिकाऱ्यांची, आणि

(दोन) त्यास आवश्यक वाटतील इतके ऐषआराम सेवा कर उपआयुक्त, ऐषआराम सेवा कर सहायक आयुक्त आणि ऐषआराम सेवा कर अधिकारी व (त्यास आवश्यक वाटतील अशा पदनामांचे) इतर अधिकारी आणि व्यक्ती यांची नियुक्ती करता येतील.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ब) च्या उपखंड (एक) किंवा (दोन) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्यांच्या अधिकारीतेतील क्षेत्राच्या मर्यादेत राज्य शासन, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अधिकारांचा वापर करील आणि त्याच्यावर सोपवण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) हा अधिनियम आणि कर बसवणे व तो वसूल करणे या संबंधात त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी त्यावर अधीक्षण व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आयुक्तांकडे निहित असेल.

नोंदणी. ८. [१][(१) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेला कोणताही हॉटेलचालक किंवा तंबाखूचा व्यापारी या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे वैध नोंदणी प्रमाणपत्र बाळगत नसेल तर, तो काम-धंदा चालवणार नाही किंवा चालवण्याची व्यवस्था करणार नाही :

परंतु, हॉटेलचालकाने किंवा, यथास्थिति, तंबाखूच्या व्यापाऱ्याने, या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे नोंदणीसाठी अर्ज केलेला असेल तर त्या हॉटेलचालकाने किंवा तंबाखूच्या व्यापाऱ्याने धंदा चालवणे किंवा चालवण्याची व्यवस्था करणे कायदेशीर असेल.

(२) नोंदणी प्रमाणपत्र बाळगणे आवश्यक असणाऱ्या प्रत्येक हॉटेलचालकाने आणि प्रत्येक तंबाखूच्या व्यापाऱ्याने, तो हॉटेलचालक किंवा, यथास्थिति, तंबाखूचा व्यापारी ज्या दिनांकास कर देण्यास प्रथम पात्र झाला त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आयुक्तांकडे अर्ज केला पाहिजे.]

(३) नोंदणीसाठी केलेला अर्ज नियमानुसार केला आहे याबद्दल आयुक्तास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्याचे समाधान झाले तर त्यांनी अर्जदाराची नोंदणी करून, विहित केलेल्या नमुन्यात त्यास नोंदणी प्रमाणपत्र दिले पाहिजे.

(४) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये पुरवण्यात आलेली किंवा अन्यथा मागविलेली किंवा मिळालेली कोणतीही माहिती विचारात घेतल्यानंतर, आयुक्तास कोणत्याही नोंदणी प्रमाणपत्रात वेळोवेळी सुधारणा करता येईल.

(५) नोंदणी करण्यात आलेल्या हॉटेल चालकाने [२][किंवा तंबाखूच्या व्यापाऱ्याने] धंदा म्हणून निवासी जागा पुरवण्याचे काम खंडित केले असेल, हस्तांतरित केले असेल किंवा अन्यथा त्याची व्यवस्था लावली असेल किंवा त्याचे कर भरण्याचे दायित्व समाप्त झाले असेल अशा प्रकरणी व त्याने विहित नमुन्यामध्ये आयुक्ताकडे अर्ज केल्यास आयुक्तास, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर नियमानुसार निश्चित केलेल्या अशा दिनांकापासून असे नोंदणीप्रमाणपत्र रद्द करता येईल.

[३][(६) नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही हॉटेलचालकाने किंवा, यथास्थिति नोंदणी करण्यात आलेल्या तंबाखूच्या व्यापाऱ्याने त्याचा कामधंदा बंद केलेला आहे, हस्तांतरित केलेला आहे किंवा अन्यथा त्यांची व्यवस्था लावली आहे आणि नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाण्यासाठी पोटकलम (५) अन्वये अर्ज करण्यात कसूर केलेली आहे याबद्दल आयुक्ताची खात्री पटेल त्याबाबतीत आयुक्त, अशा हॉटेलचालकास किंवा, यथास्थिति, तंबाखूच्या व्यापाऱ्यास त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर उक्त काम बंद झाल्याचा, हस्तांतरित झाल्याचा किंवा अन्यथा त्याची व्यवस्था लागल्याचा दिनांक म्हणून तो निश्चित करील अशा दिनांकापासून नोंदणी प्रमाणपत्र रद्द करू शकेल :

परंतु, हॉटेलचालकाच्या किंवा तंबाखूच्या व्यापाऱ्याच्या अर्जावरून अथवा अन्य प्रकारे नोंदणी प्रमाणपत्र रद्द होण्यामुळे, ते रद्द होण्याच्या दिनांकापर्यन्तच्या कोणत्याही कालावधीसाठी देय असलेला कर (कोणताही दंड किंवा व्याज यासह) भरण्याच्या अशा हॉटेलचालकाच्या किंवा तंबाखूच्या व्यापाऱ्याच्या दायित्वावर परिणाम होणार नाही—मग अशा कराचे (कोणताही दंड किंवा व्याज यासह) निर्धारण, प्रमाणपत्र रद्द होण्याच्या दिनांकापूर्वी झालेले असो किंवा त्यानंतर झालेले असो.]

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ५९(१) द्वारे पोटकलमे (१) व (२) मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आली.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५९(२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५९(३) द्वारे मूळ पोटकलम (६) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

९. कलम ११ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नोंदणीप्रमाणपत्र, ज्या हॉटेलचालकास देण्यात आले असेल त्या हॉटेलचालकाचे ते व्यक्तिगत प्रमाणपत्र असेल आणि ते हस्तांतरणीय असणार नाही. नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरणीय नसणे.

१०. (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला कोणताही हॉटेलचालक,—— कामधंदा, इत्यादीमधील बदलांसंबंधी माहिती पुरविणे.

(अ) त्याचा कामधंदा किंवा कामधंद्याचा कोणताही भाग याची विक्री करील किंवा अन्यथा त्याचा विनियोग करील किंवा कामधंद्याच्या मालकीत इतर कोणताही बदल करील व असा बदल केल्याचे त्यास माहीत असेल, किंवा

(ब) त्याचा कामधंदा बंद करील किंवा कामधंद्याची जागा बदलील किंवा कामधंद्याची नवीन जागा उघडील, किंवा

(क) त्याच्या कामधंद्याचे नाव किंवा स्वरूप बदलील, किंवा

(ड) त्याच्या कामधंद्याच्या संबंधात भागीदारी किंवा अन्य सहयोग पत्करील तर,

तो विहित मुदतीच्या आत विहित प्राधिकाऱ्यास त्याप्रमाणे कळवील;

(२) असा कोणताही हॉटेलचालक मरण पावला तर, त्याच्या मृत्युपत्र व्यवस्थापकाने, प्रशासकाने किंवा अन्य कायदेशीर प्रतिनिधीने, किंवा असा कोणताही हॉटेलचालक हा भागीदारी संस्था असेल आणि भागीदारी संस्थेच्या रचनेत बदल झाला असेल किंवा भागीदारी संस्था विसर्जित झाली असेल तर, जी व्यक्ती त्या संस्थेचा भागीदार होती अशा प्रत्येक व्यक्तीने, तशाच रीतीने, अशा मृत्युसंबंधी, रचनेतील बदलासंबंधी किंवा यथास्थिति विसर्जनासंबंधी उक्त प्राधिकाऱ्यास कळविले पाहिजे.

११. एखादा नोंदणीकृत हॉटेलचालक,—— नोंदणी प्रमाणपत्र विवक्षित परिस्थितीत चालू राहणे.

(अ) त्यांच्या कामधंद्याच्या नावात बदल करील, किंवा

(ब) भागीदारी संस्था असेल आणि तिचे विसर्जन न करता भागीदारी संस्थेच्या रचनेत बदल करण्यात आला असेल, किंवा

(क) विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त असेल आणि तिच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यात आला असेल, किंवा

(ड) पाल्यांचा पालक असेल आणि पालकामध्ये बदल झाला असेल,——

तर, केवळ पूर्वोक्त परिस्थितीपैकी कोणत्याही परिस्थितीच्या कारणावरून त्या हॉटेलचालकास किंवा रचनेत बदल झालेल्या भागीदारी संस्थेस, किंवा नवीन विश्वस्तास किंवा नवीन पालकास नवीन नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही आणि कलम १० अन्वये आवश्यक असलेल्या रीतीने माहिती पुरविल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्रांत सुधारणा करण्यात येईल.

१२. (१) प्रत्येक नोंदणीकृत हॉटेलचालक विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी, विहित करण्यात येतील अशा दिनांकांना आणि विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यास विवरणे सादर करील : विवरणे.

परंतु, आयुक्ताला, विहित करण्यात येतील अशा अटींना आणि शर्तींना अधीन राहून अशा कोणत्याही हॉटेलचालकास अशी विवरणे सादर करण्यापासून सूट देता येईल किंवा अशा कोणत्याही हॉटेलचालकास,——

(अ) अशी विवरणे अशा निरनिराळ्या कालावधीसाठी पाठविण्याची; किंवा

(ब) राज्यातील त्या हॉटेलचालकाच्या कामधंद्याच्या सर्व किंवा कोणत्याही ठिकाणासंबंधी उक्त कालावधीसाठी किंवा तो निदेश देईल अशा निरनिराळ्या कालावधींसाठी व अशा सर्व किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यास एकत्रित विवरण सादर करण्याची परवानगी देता येईल.

(२) कोणत्याही हॉटेलचालकाने पोटकलम (१) अन्वये विवरणे सादर केल्यानंतर त्यात कोणताही मजकूर वगळल्याचे किंवा चुकीचे विधान असल्याचे त्यास आढळून आले तर, त्यास मूळ विवरण सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून पुढे तीन महिने संपण्याच्या आत सुधारित विवरण सादर करता येईल.

१३. (१) कर देण्यास पात्र असलेल्या हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी, तो ज्या वर्षात अशा रीतीने कर देण्यास पात्र असेल त्या प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्रपणे करण्यात येईल : कराची आकारणी.

परंतु, आयुक्तास, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून एखाद्या वर्षाच्या भागासंबंधी कोणत्याही हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या करांची आकारणी करता येईल.

(२) नोंदणीकृत हॉटेलचालकांकडून कोणत्याही कालावधीसंबंधी सादर करण्यात आलेली विवरणे बिनचूक व परिपूर्ण असल्याविषयी आयुक्ताची खात्री झाली तर तो अशा विवरणाच्या आधारे, त्या हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी करील.

(३) नोंदणीकृत हॉटेलचालकाकडून कोणत्याही कालावधीसंबंधी पुरवण्यात आलेली विवरणे बिनचूक व परिपूर्ण नाहीत अशी आयुक्ताची खात्री झाली, आणि त्या हॉटेलचालकाला हजर राहण्यास भाग पाडणे किंवा आणखी पुरावा सादर केला जाणे आवश्यक आहे असे त्यास वाटले तर, तो अशा हॉटेलचालकाला नोटीस देऊन, त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास व अशा ठिकाणी हजर राहण्यास व असा हॉटेलचालक आपल्या विवरणाच्या पुष्ट्यर्थ ज्या पुराव्यावर अवलंबून असेल तो सर्व पुरावा सादर करण्यास किंवा करविण्यास, किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेला पुरावा सादर करण्यास फर्मावील. नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, सादर करण्यात येईल असा सर्व पुरावा विचारात घेतल्यानंतर आयुक्त त्या हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी करील.

(४) जर नोंदणीकृत हॉटेलचालकाने पोटकलम (३) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीच्या अटीचे अनुपालन करण्यात कसूर केली तर आयुक्त आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार त्याच्याकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी करील.

(५) नोंदणीकृत हॉटेलचालकाने नियत दिवशी किंवा त्यानंतर संपणाऱ्या कोणत्याही वर्षाची सर्व विवरणे विहित दिनांकांना किंवा त्या वर्षाचे शेवटचे विवरण सादर करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी सादर केलेली असतील त्याबाबतीत उक्त वर्षाच्या अखेरपासून तीन वर्षे संपल्यानंतर त्या वर्षाच्या बाबतीत पोटकलम (३) किंवा (४) अन्वये आकारणीविषयक कोणताही आदेश देता येणार नाही, आणि कोणत्याही कारणासाठी असा आदेश हा पूर्वोक्त कालावधीत देण्यात आला नाही तर अशा प्रकारे सादर करण्यात आलेली विवरणे ही अशा हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कराच्या आकारणीसाठी बिनचूक आणि परिपूर्ण म्हणून स्वीकारण्यात आल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**——कलम २ (क्यू) चा उपखंड (दोन) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदणीकृत हॉटेलचालकाने दाखल केलेल्या विवरणपत्राच्या बाबतीत, तीन वर्षांचा कालावधी, त्या व्यापाऱ्याचे ज्या वर्षाच्या संदर्भातील हिशेब त्याच्या पुस्तकात ठेवण्यात आले असतील ते वर्ष जेव्हा संपते, त्या वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून मोजण्यात येईल :

परंतु, या अधिनियमान्वये किंवा उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने अपिलात दिलेला कोणताही आदेश लक्षात घेता नव्याने आकारणी करावयाची असेल त्याबाबतीत, अशी आकारणी अशा आदेशाच्या दिनांकापासून छत्तीस महिन्यांच्या आत केली पाहिजे :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये घालून देण्यात आलेली मुदतमर्यादा मोजताना, ज्या कालावधीत उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये आकारणी स्थगित ठेवण्यात आलेली असेल तो कालावधी वगळण्यात येईल:

परंतु, तसेच, आयुक्तास, महसुलाच्या दृष्टीने व कारणे लेखी नमूद करून त्यासाठी कोणत्याही विशिष्ट कालावधीसाठी कोणत्याही विशिष्ट हॉटेलचालकाची किंवा हॉटेलचालकांच्या वर्गाची आकारणी करण्याविषयी कार्यवाही न करण्याबद्दल निदेश देता येतील. आकारणीविषयक कामकाज स्थगित ठेवण्याबाबतच्या अशा निदेशाच्या कक्षेत येणारा कालावधी या पोटकलमान्वये घालून देण्यात आलेली मुदतमर्यादा मोजताना वगळण्यात येईल.

(६) नोंदणीकृत हॉटेलचालकाने कोणत्याही कालावधीसंबंधीची विवरणे विहित दिनांकाच्या आत सादर केली नाहीत तर, आयुक्त, त्या हॉटेलचालकाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ज्या वर्षामध्ये असा कालावधी येत असेल ते वर्ष संपल्यापासून पाच वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, उक्त हॉटेलचालकाकडून कराची रक्कम (कोणतीही असल्यास) येणे असल्यास तिची आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार आकारणी करण्याची कार्यवाही करील.

(७) एखादा हॉटेलचालक कोणत्याही कालावधीसंबंधी कर देण्यास पात्र आहे, परंतु त्याने नोंदणीसाठी अर्ज करण्यात किंवा कलम ८ अन्वये आवश्यक असलेल्या मुदतीच्या आत नोंदणीसाठी अर्ज करण्यात कसूर केली आहे असे आयुक्तास सकारण वाटेल तर, आयुक्त त्या हॉटेलचालकाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ज्या वर्षामध्ये असा कालावधी येत असेल ते वर्ष संपल्यापासून आठ वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, त्या कालावधीसंबंधी आणि त्यानंतरच्या कोणत्याही कालावधीसंबंधी उक्त हॉटेलचालकाकडून कराची (कोणतीही असल्यास) रक्कम येणे असल्यास तिची आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार आकारणी करण्याची कार्यवाही करील.

(८) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदींमध्ये काहीही असले तरी हॉटेलचालकांचे लेखे बिनचूक किंवा परिपूर्ण असल्याविषयी आयुक्तांची खात्री झाली असेल त्याबाबतीत, किंवा हॉटेलचालकाने कोणत्याही लेखांकन पद्धतीचा नियमितपणे अवलंब केला नसेल त्याबाबतीत आयुक्तास हॉटेलचालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार, त्याच्याकडून येणे असलेल्या कराची रक्कम (तशी रक्कम असल्यास) निर्धारित करता येईल.

(९) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही आकारणीमुळे या अधिनियमाखालील कोणत्याही शास्तीस किंवा अपराधाबद्दल खटला भरण्यास, बाध येणार नाही.

कलम ६ अन्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे.

**१४.** या अधिनियमान्वये एखाद्या हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कोणत्याही करासंबंधी (यात कोणत्याही शास्तीचा अंतर्भाव आहे) कलम ६ अन्वये तो कर भरण्यास अन्य कोणतीही व्यक्ती पात्र असल्यास, ती अन्य व्यक्ती या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ हॉटेलचालक असल्याचे मानण्यात येईल आणि जणू ती व्यक्ती स्वतः हॉटेलचालक आहे असे समजून या अधिनियमाच्या सर्व संबंधित तरतुदी अशा दायित्वांच्या बाबतीत अशा व्यक्तीलासुद्धा लागू असतील.

आकारणीतून सुटलेल्या, कमी आकारणी केलेल्या वगैरे उलाढालीची फेरआकारणी करणे.

**१५.** (१) कलम १३ अन्वये एखाद्या हॉटेलचालकाची कोणत्याही वर्षासाठी किंवा त्याच्या भागासाठी आकारणी केल्यानंतर कोणत्याही कारणामुळे जमा रकमेची संपूर्ण उलाढाल किंवा तिचा काही भाग त्या वर्षासंबंधीच्या किंवा त्याच्या भागासंबंधीच्या आकारणीतून सुटला आहे किंवा त्यावर कमी आकारणी केली गेली आहे किंवा त्यावर कमी दराने आकारणी केली गेली आहे किंवा कोणतीही वजात चुकीची केली गेली आहे असे आयुक्तास सकारण वाटले तर, त्यास कोणत्याही बाबतीत, ते वर्ष संपल्यापासून पाच वर्षांच्या आत केव्हाही, हॉटेलचालकाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर उक्त हॉटेलचालकाकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार आकरणी किंवा फेरआकारणी करण्याची कार्यवाही करता येईल :

परंतु, कमी आकारणी झाली नसती किंवा उलाढाल आकारणीतून सुटली नसती तर ज्या दरांनी कराच्या रकमेची आकारणी करण्यात आली असती त्याच दरांनी कराच्या रकमेची आकारणी करण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, अशा उलाढालीसंबंधी या अधिनियमान्वये अपिलात किंवा पुनरीक्षणात आधीच आदेश देण्यात आला असेल तर, आयुक्ताने या अधिनियमान्वये समुचित अपील प्राधिकाऱ्याकडे किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याकडे, अहवाल सादर केला पाहिजे आणि त्यानंतर अपील प्राधिकारी किंवा पुनरीक्षण प्राधिकारी संबंधित हॉटेलचालकास आपली बाजू माडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

(२) पोटकलम (१) मधील कोणताही मजकूर कलम ३८ किंवा ४१ खालील कोणत्याही कार्यवाहीस (यामध्ये दिलेल्या कोणत्याही नोटिसांचा अंतर्भाव आहे) लागू होणार नाही.

(३) कलम ३८ किंवा ४१ मधील कोणत्याही मजकुरामुळे, या कलमाखालील कार्यवाहीस बाधा येणार नाही.

विवक्षित बाबतीत शास्ती लादणे आणि व्याज आकारणे.

**१६.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये हॉटेल चालकांकडून येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी किंवा फेरआकारणी करताना किंवा कोणत्याही अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या किंवा सुधारणेच्या कार्यवाहीत कोणताही आदेश देताना आयुक्तास असे आढळून आले की, अशा हॉटेलचालकाने—

(अ) कलम ८ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे नोंदणीसाठी अर्ज करण्यात कसूर केली आहे किंवा कलम ८ चे उल्लंघन करून नोंदणी करवून न घेता, कामधंदा चालू ठेवला आहे, किंवा

(ब) वाजवी कारणाशिवाय कलमे १३, १५, ३० किंवा ३८ खालील कोणत्याही कार्यवाहीतील कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे, किंवा

(क) कोणत्याही व्यवहाराचा तपशील लपवून ठेवला आहे किंवा विहित दिनांकाच्या आत विवरण सादर करण्यात कसूर केली आहे किंवा विवरणात कर भरण्याचे उचित दायित्व नमूद करण्यात कसूर केली आहे किंवा करदायित्वाची अचूक व योग्य गणना होण्यासाठी आवश्यक असलेली सर्व व खरी वस्तुस्थिती जाहीर करण्यात कसूर केली आहे—

तर आयुक्तास, त्या हॉटेलचालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, आकारणी किंवा फेरआकारणी करण्यात आलेल्या किंवा अपिलात अथवा यथास्थिति, पुनरीक्षणाच्या किंवा सुधारणेच्या कार्यवाहीत देय असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही कराशिवाय आणखी, पुढीलप्रमाणे रक्कम शास्ती म्हणून त्या हॉटेलचालकावर लादता येईल :—

(एक) खंड (अ) च्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणांच्याबाबतीत, हॉटेलचालकाने ज्या कालावधीत, कलम ८ चे उल्लंघन करून, नोंदणी न करता कामधंदा चालू ठेवला असेल, त्या कालावधीसाठी हॉटेलचालकाकडून देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम;

(दोन) खंड (ब) च्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत एक हजार रुपयांपेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम; आणि

(तीन) खंड (क) च्या कक्षेत येणाच्या प्रकरणाच्या बाबतीत, उक्त खंडान्वये देय असल्याचे आढळून आलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम.

[१][(२) (अ) एखाद्या हॉटेलचालकाने, या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये जेवढ्या मुदतीत कर भरणे आवश्यक असेल तेवढ्या मुदतीत त्याने कर भरला नाही तर तो अशा कराच्या रकमेबरोबरच त्याने ज्या शेवटच्या दिनांकापर्यंत असा कर भरावयास हवा होता त्या दिनांकानंतरच्या प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या रकमेच्या दोन टक्क्यांइतकी रक्कम सरळ व्याज म्हणून भरण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—कलम १८ मध्ये किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या खंडाच्या प्रयोजनार्थ, विवरणानुसार देय असलेल्या कराच्या किंवा यथास्थिति, विवरणात समाविष्ट असलेल्या कालावधीसाठी करावयाच्या कर प्रदानाच्या संबंधात, हॉटेलचालकाने किंवा एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये आवश्यक असल्याप्रमाणे असे विवरण सादर करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी अशा कराची संपूर्ण रक्कम भरलेली नसेल तर, त्याने / तिने या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये अशा कराची रक्कम ज्या कालावधीत भरणे आवश्यक असेल त्या कालावधीत अशा कराची रक्कम भरलेली नाही असे समजण्यात येईल; आणि त्यानुसार, त्याने अशा दिनांकापर्यंत अशा कराची रक्कम भरलेली नसेल किंवा अशा कराच्या रकमेचा केवळ काही भाग भरलेला असेल तर तो, अशा दिनांकानंतर अशा दिनांकास अदत्त राहिलेल्या अशा कराच्या संपूर्ण रकमेवर किंवा यथास्थिति, तिच्या भागावर कर देण्यास या खंडान्वये पात्र असेल.

(ब) खंड (अ) अन्वये ज्यावर व्याज बसवण्याजोगे आहे अशा कराव्यतिरिक्त इतर कोणताही कर कोणत्याही निर्धारण कालावधीच्या संबंधातील अंतिम विवरण दाखल करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या दिनांकास अदत्त असेल तर तो हॉटेलचालक, त्या व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे ज्या कालावधीसाठी निर्धारण करण्यात आलेले असेल तो कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या दिनांकापासून निर्धारण

१. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम २० द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

आदेशाच्या दिनांकापर्यंत प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्क्यांइतकी रक्कम सरळव्याज म्हणून देण्यास पात्र असेल आणि अशा अदत्त कराचे कोणतेही प्रदान, मग ते पूर्णतः असो किंवा अंशतः असो, निर्धारण आदेशाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी करण्यात येईल त्या बाबतीत, अशा प्रदानाची रक्कम आणि दिनांक विचारात घेऊन अशा व्याजाच्या रकमेची गणना करण्यात येईल. अशा प्रकारे अदत्त राहिलेल्या कराच्या रकमेत या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा परिणाम म्हणून वाढ झाली किंवा यथास्थिति, घट झाली तर व्याजात त्यानुसार वाढ किंवा घट करण्यात येईल :

परंतु, आयुक्त किंवा कोणतेही अपील प्राधिकरण, कोणत्याही कालावधीच्या संबंधात देय असलेले संपूर्ण व्याज किंवा त्याचा कोणताही भाग कारणे लेखी नमूद करून माफ करू शकेल.]

विवक्षित तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती लादणे.

**१७.** (१) जर कोणतीही व्यक्ती—

(अ) (एक) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला हॉटेलचालक नसताना कर म्हणून कोणतीही रक्कम वसूल करील, किंवा

(दोन) नोंदणीकृत हॉटेलचालक असून तो देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा कोणतीही अधिक रक्कम कर म्हणून वसूल करील, किंवा

(तीन) कलम २७ मधील तरतुदींचे उल्लंघन करून अन्यथा कर वसूल करील, किंवा

(ब) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला हॉटेलचालक असून किंवा ज्याच्यावर नोटीस बजावून आयुक्ताने तसे करण्याबद्दल ज्यास फर्माविले आहे असा हॉटेलचालक असून ती जमा रकमेच्या उलाढालीचा खरा हिशेब ठेवण्यात कलम २९, पोटकलम (१) चे उल्लंघन करून कसूर करील किंवा त्या कलमान्वये तसे करण्याविषयी निदेश देण्यात आला असता अशा निदेशानुसार कोणतेही हिशेब किंवा अभिलेख ठेवण्यात कसूर करील,

तर ती व्यक्ती, जो कोणताही कर देण्यास ती पात्र असेल त्याशिवाय आणखी, पुढीलप्रमाणे शास्तीची रक्कम देण्यास पात्र असेल :—

(**अ**) खंड (अ) च्या उपखंड (एक) किंवा (तीन) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे उल्लंघन झाले असेल त्या बाबतीत, दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम किंवा कर म्हणून वसूल केलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम, यांपैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमे इतकी शास्ती,

(**ब**) खंड (अ) चा उपखंड (दोन) किंवा खंड (ब) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे उल्लंघन झाले असेल त्याबाबतीत, दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमे इतकी शास्ती;

व त्याशिवाय आणखी, त्या व्यक्तीने कलम २७ चे उल्लंघन करून कर म्हणून वसूल केलेली कोणतीही रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना किंवा अन्यथा आयुक्तास असे सकारण वाटत असेल की, कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) अन्वये कोणत्याही रकमेच्या शास्तीस किंवा जप्तीस किंवा शास्ती व जप्ती या दोहोंस पात्र झाली आहे, तर त्याने अशा व्यक्तीवर विहित नमुन्यात नोटीस बजावून त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास व अशा ठिकाणी त्या व्यक्तीस हजर राहण्यास आणि पोटकलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तिच्यावर कोणतीही रक्कम शास्ती म्हणून किंवा जप्ती म्हणून किंवा शास्ती व जप्ती म्हणून का लादण्यात येऊ नये याची कारणे दाखवण्यास फर्मावील.

(३) आयुक्त त्यानंतर चौकशी करून त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

(४) या कलमान्वये ज्या गोष्टीसाठी शास्ती लादण्यात आली असेल, त्याच गोष्टींच्या बाबतीत, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

(५) जप्तीचा कोणताही आदेश दिला असेल अशा बाबतीत आयुक्त विहित करण्यात येईल असा तपशील देणारी त्याबद्दलची नोटीस विहित करण्यात येईल अशा रीतीने संबंधित व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करील किंवा प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

करांचा भरणा. **१८.** (१) कर, यामध्ये तरतूद केलेल्या रीतीने आणि विहित करण्यात येईल अशा कालांतराने भरण्यात येईल.

(२) कलम १२, पोटकलम (१) अनुसार आवश्यक असलेले विवरण सादर करणारा नोंदणीकृत हॉटेलचालक अशा विवरणानुसार त्याच्याकडून येणे असलेल्या कराची संपूर्ण रक्कम कलम १६ अन्वये त्याच्याकडून देय असलेल्या शास्तीच्या किंवा व्याजाच्या रकमेसह विहित करण्यात येईल अशा रीतीने शासकीय कोषागारात भरील.

(३) कलम १२, पोटकलम (२) अनुसार, आधीच भरलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम देय असल्याचे दर्शविणारे सुधारित विवरण सादर करणारा नोंदणीकृत हॉटेलचालक कराची जादा रक्कम प्रथम शासकीय कोषागारात भरील.

(४) (अ) (एक) देय असलेल्या कराची पूर्ण रक्कम न भरता विवरणे सादर करण्यात आली असतील तर ती कराची रक्कम, किंवा

(दोन) कलम १३ किंवा कलम १५ अन्वये कोणत्याही कालावधीकरिता आकारणी किंवा फेरआकारणी केलेल्या कराच्या रकमेतून अशा कालावधीकरता त्या व्यापाऱ्याने आधीच भरलेली कोणतीही रक्कम वजा जाता बाकी राहिलेली रक्कम, किंवा

(ब) कलम १६ किंवा १७ अन्वये बसवलेली व्याजाची किंवा शास्तीची रक्कम (कोणतीही असल्यास), आणि

(क) कलम १७ अन्वये सरकारजमा केलेली रक्कम (कोणतीही असल्यास), आणि

(ड) कलम ३४, पोटकलम (३) अन्वये लादण्यात आलेली दंडाची रक्कम (कोणतीही असल्यास),

तो हॉटेलचालक किंवा त्याकरिता जबाबदार असणारी व्यक्ती या प्रयोजनासाठी आयुक्ताने काढलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास सरकारी कोषागारात भरील. हा दिनांक नोटीस बजावल्याच्या दिनांकासपासून तीस दिवसांच्या पूर्वीचा असता कामा नये :

परंतु, आयुक्तास, कोणत्याही विशिष्ट व्यापाऱ्याच्या बाबतीत किंवा व्यक्तीच्या बाबतीत कारणे लेखी नमूद करून असा कर व्याज किंवा शास्ती (कोणतीही असल्यास) किंवा जप्त केलेली रक्कम हप्त्याहप्त्याने भरण्याची त्यास परवानगी देता येईल.

(५) रक्कम देण्यासाठी दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर भरावयाचा राहिलेला कोणताही कर, शास्ती किंवा व्याज किंवा जप्त केलेली रक्कम आणि योग्य रीतीने न भरलेला कोणताही हप्ता जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

(६) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या व्यक्तीने कलम २७ चे उल्लंघन करून कर म्हणून वसूल केलेली कोणतीही रक्कम कलम १७ अन्वये राज्य शासनाकडे जमा करण्यात आली असेल व त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल त्याबाबतीत असा भरणा किंवा वसुली यामुळे, ज्या व्यक्तीकडून ती अशा रीतीने वसूल करण्यात आली असेल त्या व्यक्तीस ती परत करण्याच्या दायित्वातून उक्त व्यक्तीची मुक्तता होईल. ज्या व्यक्तीकडून कर म्हणून अशी रक्कम वसूल करण्यात आली असेल त्या व्यक्तीस शासनाकडे अशा रकमेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या परताव्याची मागणी करता येईल, परंतु अशा मागणीसाठी करावयाचा अर्ज तिने विहित नमुन्यात,जप्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत आयुक्ताकडे लेखी केला पाहिजे. असा कोणताही अर्ज मिळाल्यानंतर आयुक्त त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि ती मागणी विधिग्राह्य व स्वीकार्य आहे आणि परतावा म्हणून अशा रीतीने मागणी करण्यात आलेली रक्कम सरकारी कोषागारात प्रत्यक्ष भरण्यात आली आहे किंवा वसूल करण्यात आली आहे अशी आयुक्ताची खात्री झाली तर, तो संबंधित व्यक्तीस जी देय असल्याचे आढळून आले असेल अशी रक्कम किंवा तिचा कोणताही भाग परत करील.

कर, इत्यादी पूर्ण रकमेत घेणे. **१९.** या अधिनियमाच्या तरतुदींन्वये देय असलेला कर, शास्ती, व्याज, तडजोडीदाखलची रक्कम, दंड किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये देय असलेली इतर कोणतीही रक्कम नजिकच्या पूर्ण रुपयापर्यन्त

पूर्णांकित करण्यात येईल; आणि या प्रयोजनासाठी अशी रक्कम पैशात असेल तेव्हा, असा पैशाचा भाग, पन्नास पैसे किंवा त्यापेक्षा अधिक असेल त्या बाबतीत तो एक रुपया समजला जाईल आणि असा भाग पन्नास पैशापेक्षा कमी असेल त्या बाबतीत तो हिशेबात घेतला जाणार नाही:

परंतु, या कलमातील कोणताही मजकूर या अधिनियमान्वये एखाद्या व्यापाऱ्याने कराच्या रुपाने केलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीस लागू होणार नाही.

कराची वसुली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे करण्यासंबंधी विक्रीकर प्राधिकाऱ्याचे विशेष अधिकार.

**२०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तरतुदीअन्वये कोणत्याही हॉटेल चालकाकडून किंवा अन्य व्यक्तीकडून कराची, दंडाची, व्याजाची आणि जप्त करावयाची देय किंवा वसुलीयोग्य रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ ,—

१९६६ चा महा. ४१.

(एक) ऐषआराम सेवा कर आयुक्तास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये आयुक्तास असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि त्या आयुक्ताची सर्व कर्तव्ये पार पाडील;

(दोन) ऐषआराम सेवा कर अपर आयुक्तास, उक्त संहितेअन्वये अपर आयुक्तास असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि त्या अपर आयुक्ताची सर्व कर्तव्ये तो पार पाडील;

(तीन) ऐषआराम सेवा कर उप आयुक्तास उक्त संहितेअन्वये जिल्हाधिकाऱ्याला असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि जिल्हाधिकाऱ्याची सर्व कर्तव्ये तो पार पाडील;

(चार) ऐषआराम सेवा कर सहायक आयुक्तास उक्त संहितेअन्वये सहायक जिल्हाधिकाऱ्यास किंवा उप जिल्हाधिकाऱ्यास असलेले सर्व अधिकार (अटक करण्याचे व कसूरदारास दिवाणी तुरूंगामध्ये अडकवून ठेवण्याचे अधिकार वगळून) असतील व तो त्यांचा वापर करील आणि सहायक जिल्हाधिकाऱ्याची किंवा उप जिल्हाधिकाऱ्याची सर्व कर्तव्ये पार पाडील ;

(पाच) ऐषआराम सेवा कर अधिकाऱ्यास, उक्त संहितेअन्वये तहसिलदारास असलेले सर्व अधिकार (विक्री कायम करणे व अटक करणे आणि कसूरदारास दिवाणी तुरूंगामध्ये अडकवून ठेवणे, हे अधिकार वगळून) असतील व तो त्यांचा वापर करील आणि तहसिलदाराची सर्व कर्तव्ये तो पार पाडील.

(२) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिलेली प्रत्येक नोटीस किंवा काढलेला प्रत्येक आदेश कलमे ३५, ३६, ३७, ३८ व ४१ यांच्या प्रयोजनार्थ या अधिनियमान्वये दिलेली नोटीस किंवा काढलेला आदेश असल्याचे समजण्यात येईल.

वसुलीची खास पद्धत व वसुलीच्या विवक्षित कार्यवाह्या.

**२१.** (१) त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, आयुक्ताला कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी लेखी नोटिशीद्वारे, अशा नोटिशीची एक प्रत आयुक्ताला माहीत असलेल्या त्या हॉटेल चालकाच्या शेवटच्या पत्त्यावर पाठवून—

(अ) ज्या हॉटेलचालकावर कलम १८, पोटकलम (४) अन्वये नोटीस बजावण्यात आली असेल त्या हॉटेलचालकास ज्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही रक्कम येणे असेल किंवा येणे होईल त्या व्यक्तीस, किंवा

(ब) जी कोणतीही व्यक्ती अशा हॉटेलचालकासाठी किंवा अशा हॉटेलचालकाच्या वतीने पैसा धारण करीत असेल किंवा नंतर धारण करील त्या व्यक्तीस,

पैसे येणे झाल्यावर किंवा धारण केल्यावर ताबडतोब किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या (परंतु वर सांगितल्याप्रमाणे पैसे येणे होण्यापूर्वीच्या किंवा धारण करण्यापूर्वीच्या नसलेल्या) वेळी किंवा वेळेच्या आत, या अधिनियमाखालील कराची थकबाकी दंड, व्याज किंवा जप्त केलेली रक्कम यांच्या बाबतीत हॉटेल चालकाकडून येणे असलेली रक्कम भरण्यास पुरेसा असेल इतका पैसा किंवा हा पैसा त्या रकमेइतका किंवा तिच्यापेक्षा कमी असेल तर तो सर्व पैसा आयुक्ताकडे भरण्यास फर्माविता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीकडून हॉटेल चालकास येणे असलेल्या किंवा कोणत्याही व्यक्तीने हॉटेलचालकासाठी किंवा हॉटेल चालकाच्या वतीने धारण केलेल्या रकमेची परिगणना, अशा हॉटेलचालकाकडून अशा व्यक्तीस देणे झाल्या असतील अशा, कायदेशीर रीतीने अस्तित्वात असलेल्या मागण्या (कोणत्याही असल्यास) त्यामधून वजा केल्यानंतर, करण्यात येईल.

(२) आयुक्तास कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी अशा कोणत्याही नोटिशीत सुधारणा करता येईल किंवा ती रद्द करता येईल किंवा अशा नोटिशीस अनुसरून कोणतीही रक्कम भरण्याची मुदत वाढविता येईल.

(३) (अ) या कलमाखालील नोटिशीचे अनुपालन करण्याकरिता कोणतीही रक्कम भरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने हॉटेल चालकाच्या प्राधिकारानुसार अशी रक्कम भरली आहे असे मानले जाईल, आणि आयुक्ताच्या पावतीवरून, तीत उल्लेखिलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत अशा व्यक्तीने आपले दायित्व योग्य आणि पुरेशा रीतीने पार पाडल्याचे प्रस्थापित होईल.

(ब) या कलमात निर्दिष्ट केलेली नोटीस मिळाल्यानंतर हॉटेलचालकाचे कोणतेही दायित्व पार पाडणारी कोणतीही व्यक्ती, तिने पार पाडलेल्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत किंवा हॉटेलचालकाच्या कर, दंड आणि जप्त केलेली रक्कम यांसंबंधीच्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत, यापैकी जी कमी असेल त्यापुरती आयुक्तास व्यक्तीशः दायी असेल.

(क) ज्या व्यक्तीस या कलमान्वये नोटीस पाठविण्यात आली असेल त्या व्यक्तीने, मागणी केलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग तिच्याकडून हॉटेलचालकास देय नाही किंवा ती व्यक्ती त्या हॉटेलचालकासाठी किंवा हॉटेलचालकाच्या वतीने कोणताही पैसा धारण करत नाही असे आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केले तर, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे त्या व्यक्तीस, अशी कोणतीही रक्कम किंवा यथास्थिति तिचा भाग आयुक्ताकडे भरणे आवश्यक आहे असे मानले जाणार नाही.

(ड) या कलमान्वये जी कोणतीही रक्कम एखाद्या व्यक्तीने आयुक्तास देणे आवश्यक असेल किंवा ज्याकरिता ती या कलमान्वये आयुक्तास व्यक्तिशः दायी असेल अशी रक्कम भरावयाची राहिल्यास ती रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

(४) जेव्हा कलम १८, पोटकलम (४) अन्वये, कोणत्याही कराच्या किंवा दंडाच्या किंवा व्याजाच्या बाबतीत मागणीची (ज्याचा या कलमात यापुढे '' येणे असलेल्या सरकारी रकमा '' असा निर्देश केला आहे) कोणतीही नोटीस, हॉटेलचालकावर किंवा त्याकरता दायी असणाऱ्या व्यक्तीवर बजावण्यात आली असेल, आणि अशा येणे असलेल्या सरकारी रकमांच्या बाबतीत कोणतेही अपील किंवा अन्य कार्यवाही दाखल करण्यात आली असेल किंवा हाती घेण्यात आली असेल, त्याबाबतीत,—

(अ) अशा अपिलात किंवा कार्यवाहीत येणे असलेली अशी सरकारी रक्कम वाढविण्यात आली असेल तर, आयुक्त त्या हॉटेलचालकावर किंवा यथास्थिति, व्यक्तीवर येणे असलेली सरकारी रक्कम जेवढ्या रकमेने वाढवण्यात आली असेल तेवढ्याच रकमेच्या बाबतीत दुसरी नोटीस बजावील आणि असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी त्याच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीअन्वये किंवा नोटिशीअन्वये येणे असलेल्या सरकारी रकमेसंबंधी केलेली वसुलीची कोणतीही कार्यवाही ही कोणतीही नवीन नोटीस न बजावता असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढण्याच्या निकटपूर्वी ज्या टप्प्यावर होती त्या टप्प्यापासून पुढे चालू ठेवता येईल ;

(ब) अशा अपिलात, पुनरीक्षणात किंवा कार्यवाहीत अशी येणे असलेली सरकारी रक्कम कमी करण्यात आली असेल तर—

(एक) आयुक्ताने त्या हॉटेलचालकावर किंवा व्यक्तीवर नवीन नोटीस बजावणे आवश्यक असणार नाही ;

(दोन) आयुक्त त्यास अशी येणे असलेली सरकारी रक्कम कमी केल्याची सूचना देईल ;

(तीन) असे अपील, किंवा कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी त्याच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीच्या किंवा नोटिशीच्या आधारे सुरू करण्यात आलेली वसुलीची कोणतीही कार्यवाही ही, अशा रीतीने कमी केलेल्या रकमेच्या बाबतीत, असे अपील, किंवा कार्यवाही निकालात काढण्याच्या निकटपूर्वी ज्या अवस्थेत होती त्या अवस्थेपासून पुढे चालू ठेवता येईल ;

(क) असे अपील, किंवा कार्यवाही निकालात काढल्यानंतर त्या हॉटेलचालकावर किंवा व्यक्तीवर मागणीची नवीन नोटीस बजावली नाही, किंवा अशा अपिलात, किंवा कार्यवाहीत अशी येणे असलेली सरकारी रक्कम वाढविण्यात आली आहे किंवा कमी करण्यात आली आहे, केवळ याच कारणामुळे, अशा येणे असलेल्या रकमेच्या बाबतीत वसुलीची कोणतीही कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही:

परंतु, अशा अपिलात, किंवा कार्यवाहीत येणे असलेली कोणतीही सरकारी रक्कम कमी करण्यात आली असेल आणि त्या हॉटेलचालकास किंवा व्यक्तीस त्याबाबत कोणताही परतावा मिळण्याचा हक्क असेल तर, कलम २३ मधील तरतुदीनुसार त्यास असा परतावा दिला पाहिजे.

(५) शंकेचे निरसन व्हावे म्हणून, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमाखालील अपिलात, पुनरीक्षणात किंवा अन्य कार्यवाहीत दिलेल्या कोणत्याही आदेशाचा परिणाम म्हणून, येणे असलेल्या सरकारी रकमेत बदल झाला नसेल तर, अशा कोणत्याही बाबतीत मागणीची कोणतीही नवीन नोटीस आवश्यक असणार नाही.

**२२.** (१) राज्य शासनाला, ते लादील अशा शर्तीना अधीन राहून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक असल्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विक्रीच्या किंवा खरेदीच्या कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या वर्गाच्या बाबतीत या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये देय असलेला कोणताही कर पूर्णपणे किंवा त्याचा कोणताही भाग यापासून हॉटेलमध्ये पुरविण्यात येणाऱ्या कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या ऐषआराम सेवांच्या वर्गाच्या बाबतीत सूट देता येईल आणि अशी सूट **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्यात नमूद करण्यात येईल अशा अन्य दिनांकापासून अमलात येईल. सूट.

(२) हॉटेलचालक किंवा व्यक्ती अशा सुटीचा उपयोग करून घेत असेल आणि सूट ज्या कोणत्याही शर्तीला अधीन राहून देण्यात आली असेल तिचे कोणत्याही कारणास्तव पालन करण्यात आलेले नसेल त्याबाबतीत असा हॉटेलचालक किंवा व्यक्ती या अधिनियमाच्या अन्य तरतुदीनुसार अशा ऐषआराम सेवांवर ऐषआराम सेवा कर भरण्यास पात्र ठरेल.

(३) जर कोणतीही व्यक्ती पोटकलम (२) अन्वये कर देण्यास पात्र आहे असे आयुक्तास सकारण वाटत असेल तर त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आयुक्त अशा रीतीने येणे असलेल्या कराच्या रकमेची आकारणी करील.

**२३.** (१) एखाद्या व्यक्तीने तिच्याकडून कराची आणि दंडाची किंवा व्याजाची (काही असल्यास) रक्कम येणे असता त्या रकमेपेक्षा अधिक रक्कम भरली असल्यास आयुक्त ती परत करील. असा परतावा रोख रक्कम देऊन किंवा त्या व्यक्तीच्या विकल्पानुसार अन्य कोणत्याही कालावधीच्या बाबतीत देय असलेल्या कराच्या आणि दंडाच्या रकमेतून अशी अधिक रक्कम वजा करून देता येईल : अतिरिक्त प्रदानाचा परतावा.

परंतु, आयुक्त अशा अधिक रकमेचा विनियोग प्रथम येणे असलेल्या ज्या कोणत्याही रकमेच्या संबंधात कलम १८, पोटकलम (४) अन्वये नोटीस देण्यात आली असेल ती रक्कम वसूल करण्यासाठी करील आणि त्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम (काही असल्यास) परत करील.

(२) कोणत्याही हॉटेलचालकाने कोणत्याही कालावधीसाठी सादर केलेल्या विवरणानुसार त्याला कोणताही परतावा देय होत असेल त्याबाबतीत, त्याला कोणत्याही कालावधीसाठी कलम १२ अन्वये सादर केलेल्या विवरणानुसार देय व बाकी असलेल्या करा पोटी असा परतावा तात्पुरता समायोजित करता येईल :

परंतु, अशा समायोजनाच्या दिनांकाला हॉटेलचालकाकडून येणे आणि देय असलेली कराची किंवा शास्तीची रक्कम किंवा या दोन्ही रकमा, समायोजन करण्यापूर्वी प्रथम अशा परताव्यामधून वजा केल्या जातील.

कराचा परतावा.

[१][**२३अ.** तंबाखूच्या व्यापाऱ्याने कोणताही तंबाखू भारतातून निर्यात केलेला असेल, किंवा आंतरराज्यीय व्यापार करताना विकलेला असेल किंवा, यथास्थिति, आंतरराज्यीय मालपाठवणी म्हणून राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी पाठवलेला असेल–मग अशी मालपाठवणी त्याच्या स्वत:कडे असो किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे केलेली असो–तेव्हा राज्य शासन तंबाखूच्या व्यापाऱ्याला कराचा परतावा देण्यासाठी नियमांद्वारे तरतूद करू शकेल.]

उशिरा परत केलेल्या रकमांवरील व्याज.

**२४.** (१) या अधिनियमान्वये काढलेल्या आदेशाच्या आधारे आयुक्ताकडून कोणत्याही व्यक्तीला परत करणे आवश्यक असलेली रक्कम आदेश काढल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत तिला अशा रीतीने परत केली नाही तर, राज्य शासन, नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर लगेच येणाऱ्या दिनांकापासून ती रक्कम परत करण्याच्या दिनांकापर्यंत अशा रकमेवर अशा व्यक्तीस दरसाल दर शेकडा नऊ टक्के या दराने सरळ व्याज देईल.

**स्पष्टीकरण.**—पूर्वोक्त नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत रक्कम परत करण्यास हॉटेलचालकामुळे उशीर झाला असेल–मग तो पूर्णत: झालेला असो किंवा अंशत: झालेला असो, तर त्याच्यामुळे उशीर झालेला कालावधी हा ज्या कालावधीकरता व्याज देय असेल त्या कालावधीतून वगळण्यात येईल.

(२) या कलमातील तरतुदीअन्वये व्याजाची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळावयाच्या कालावधीसंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास अशा प्रश्नावर आयुक्त निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

विवक्षित प्रकरणात परतावा रोखून ठेवण्याचा अधिकार.

**२५.** (१) ज्या आदेशामुळे रक्कम परत करण्याचा प्रश्न उद्‌भवेल असा आदेश एखादा अपिलाचा किंवा पुढील कार्यवाहीचा विषय असेल किंवा त्याविषयी या अधिनियमाखालील इतर कोणतीही कार्यवाही प्रलंबित असेल, आणि अशी रक्कम परत केल्यास महसुलावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे असे अशा परताव्यास मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याचे मत असेल तर अशा प्राधिकाऱ्यास, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेने, आयुक्त निश्चित करील अशा वेळेपर्यंत परताव्याची रक्कम रोखून ठेवता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये परतावा रोखून ठेवण्यात आला असेल तेथे राज्य शासन, अपील किंवा पुढील कार्यवाहीचा परिणाम म्हणून त्या व्यक्तीस देय होणाऱ्या अंतिमरीत्या निश्चित करण्यात येईल अशा परताव्याच्या रकमेवर, कलम २४ च्या तरतुदींनुसार पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश काढल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर लगेच येणाऱ्या दिनांकापासून परताव्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरता व्याज देईल.

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ६० द्वारे कलम २३-अ समाविष्ट करण्यात आले.

२६. आयुक्तास, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत व अशा शर्तीना अधीन राहून कोणत्याही हॉटेलचालकाकडून कोणत्याही कालावधीच्या बाबतीत देय असलेल्या करापासून पूर्णतः किंवा अंशतः माफी देता येईल : करापासून माफी.

परंतु, माफी द्यावयाची रक्कम दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय अशा अधिक रकमेची माफी देता येणार नाही.

२७. (१) या अधिनियमान्वये ज्या व्यवहारावर कोणताही कर देण्यात एखादी व्यक्ती पात्र नसेल अशा कोणत्याही व्यवहाराच्या बाबतीत त्या व्यक्तीने कराच्या रुपाने कोणतीही रक्कम गोळा करता कामा नये. विवक्षित बाबतीत कर गोळा करण्यास मनाई.

(२) जी व्यक्ती नोंदणीकृत [1][हॉटेलचालक किंवा तंबाखूचा व्यापारी नसेल आणि ती तिच्या कामधंद्याच्या बाबतीत कर भरण्यास पात्र नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही व्यक्तीकडून कराच्या रूपाने कोणतीही रक्कम गोळा करता कामा नये आणि कोणत्याही नोंदणीकृत हॉटेलचालकाने किंवा तंबाखूच्या व्यापाऱ्याने] या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा कोणतीही अधिक रक्कम कर म्हणून गोळा करता कामा नये :

परंतु, त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीअन्वये एखाद्या व्यक्तीवर लादण्यात आलेल्या शर्तीचे आणि निर्बंधाचे अनुपालन करण्याकरिता त्या व्यक्तीने अशी कराची रक्कम स्वतंत्रपणे गोळा करणे आवश्यक असेल तर, हे पोटकलम लागू असणार नाही.

२८. नोंदणीकृत हॉटेलचालक, त्याने किंवा त्याच्या नोकराने, व्यवस्थापकाने किंवा एजंटाने अनुक्रमांक दिलेले व सही करून दिनांक घातलेले बिल किंवा रोखीचे टिपण ग्राहकास किंवा ग्राहकांना देईल आणि त्या बिलात किंवा रोखीच्या टिपणात विहित करण्यात येईल असा अन्य तपशील देईल. त्याने रीतसर सही केलेल्या व दिनांक घातलेल्या अशा बिलाची किंवा रोखीच्या टिपणाची स्थळप्रत किंवा दुसरी प्रत ठेवील आणि व्यवहाराच्या दिनांकापासून कमीत कमी पाच वर्षांपर्यंत ती जपून ठेवील. ग्राहकांना द्यावयाचे बिल किंवा रोखीचे टिपण.

२९. (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला प्रत्येक हॉटेलचालक आणि विहित रीतीने नोटीस बजावून आयुक्ताने ज्यास तसे करण्यास भाग पाडले असेल असा अन्य प्रत्येक हॉटेलचालक, त्याने हॉटेलमध्ये पुरविलेल्या ऐषआरामाच्या सेवांविषयीचा खरा हिशेब ठेवील. हिशेब.

(२) एखादा हॉटेलचालक कोणत्याही कालावधीत कर देण्यास पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी असे ठेवलेले हिशेब पुरेसे स्पष्ट किंवा समजण्यासारखे नाहीत, किंवा पुरवलेल्या विवरणांची किंवा विवरणपत्राची योग्य छाननी करता येणार नाही अशा रीतीने ते ठेवण्यात आले आहेत असे आयुक्तास वाटले तर, त्यास अशा हॉटेलचालकास लेखी नोटिशीद्वारे, योग्य आकारणीच्या प्रयोजनासाठी त्याच्या मते आवश्यक असेल अशा नमुन्यात किंवा अशा रीतीने आणि त्याबाबत विहित करण्यात येईल अशा कोणत्याही गोष्टीना अधीन राहून, तो लेखी निदेश देईल त्याप्रमाणे असे हिशेब ठेवण्यास फर्मावता येईल.

(३) आयुक्तास, याबाबत विहित करण्यात येतील अशा शर्तीना किंवा निर्बंधाना अधीन राहून लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही हॉटेलचालकास, किंवा **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे हॉटेलचालकांच्या कोणत्याही वर्गास तो विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, त्यांनी केलेल्या व्यवहारासंबंधी तो विनिर्दिष्ट करील असा तपशील दर्शविणारे हिशेब आणि अभिलेख ठेवण्याबद्दल निदेश देता येईल.

(४) प्रत्येक नोंदणीकृत हॉटेलचालक, सर्वसाधारणपणे त्याच्या व्यवहाराच्या संबंधातील त्याचे सर्व हिशेब, नोंदवह्या आणि कागदपत्रे, त्याच्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या धंद्याच्या एका किंवा अनेक ठिकाणी किंवा, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेने आयुक्तास संमत असेल अशा अन्य ठिकाणी ठेवील.

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ६१ द्वारे " हॉटेलचालक नसेल "? या शब्दांनी सुरु होणाऱ्या आणि " कोणत्याही हॉटेल चालकाने " या शब्दांनी समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

हिशेब व कागदपत्रे सादर करणे व त्यांची पाहणी करणे आणि परिवास्तूची झडती.

३०. (१) आयुक्तास, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीनराहून, कोणत्याही हॉटेल चालकास कोणतेही हिशेब किंवा कागदपत्रे त्याच्यापुढे सादर करण्यास, किंवा त्या हॉटेलचालकाच्या व्यवसायासंबंधी कोणतीही माहिती पुरवण्यास किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल अशी त्याच्या धंद्यासंबंधी अन्य कोणतीही माहिती पुरवण्यास फर्मावता येईल.

(२) कोणत्याही हॉटेलचालकाच्या व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व हिशेब, नोंदवह्या व कागदपत्रे, आणि कोणत्याही हॉटेलचालकाच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी ठेवलेली सर्व रोकड आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस सर्व वाजवी वेळी पाहणीसाठी खुली असली पाहिजे, आणि आयुक्तास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक वाटतील अशा उक्त हिशेबाच्या, नोंदवह्यांच्या किंवा कागदपत्राच्या प्रती किंवा उतारे आणि रोख रकमेची सूची घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

(३) कोणत्याही हॉटेल चालकाने त्याच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही कराची रक्कम भरण्याचे टाळले आहे किंवा तो टाळण्याचा प्रयत्न करीत आहे असे आयुक्तास सकारण वाटत असेल तर कारणे लेखी नमूद करून त्यास आवश्यक वाटतील असे, त्या हॉटेल चालकाचे हिशेब, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करता येतील, आणि त्याबद्दल तो पावती देईल, आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्याकरिता आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल.

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) च्या प्रयोजनासाठी आयुक्तास, कोणत्याही हॉटेल चालकाच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी, किंवा अन्य ज्या कोणत्याही ठिकाणी हॉटेल चालक त्याच्या धंद्याचे हिशेब, नोंदवह्या किंवा कागदपत्रे ठेवत आहे किंवा त्यावेळी त्याने ठेवली आहेत असे आयुक्तास सकारण वाटत असेल, त्या ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या जागेची झडती घेता येईल.

(५) झडती घेत असताना कोणतीही हिशेबाची पुस्तके इतर दस्तऐवज, पैसे कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणात असल्याचे आढळून आल्यास, एतद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, अशी हिशेबाची पुस्तके इतर दस्तऐवज, पैसे अशा व्यक्तीच्या मालकीच्या आहेत असे गृहीत धरण्यात येईल.

हॉटेल चालकाने [1][आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याने] आपल्या धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव जाहीर करणे.

३१. जो हॉटेल चालक [2][आणि तंबाखूचा व्यापारी] कर देण्यास पात्र असेल आणि जो अविभक्त हिंदू कुटुंब किंवा संघ किंवा क्लब किंवा संस्था किंवा भागीदारी संस्था किंवा कंपनी असेल, किंवा जो पालक किंवा विश्वस्त म्हणून किंवा अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने धंदा चालवीत असेल अशा प्रत्येक हॉटेलचालकाने [2][आणि तंबाखूच्या व्यापाऱ्याने] ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अशा [3][ * * * ] धंद्याच्या किंवा धंद्याचे व्यवस्थापक म्हणून मानण्यात येईल अशा व्यक्तीचे नाव किंवा व्यक्तींची नावे नमूद करणारे प्रतिज्ञापन विहित केलेल्या कालावधीच्या आत विहित केलेल्या रीतीने विहित प्राधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे. असे प्रतिज्ञापन वेळोवेळी सुधारता येईल.

आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

३२. (१) या अधिनियमाची अधिक चांगल्या रीतीने अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाला वाटले तर, त्यास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार विचार करण्यात येईल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आकडेवारी गोळा करण्यात यावी, अशा निदेश देता येईल.

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम ६२ (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६२ (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम २३ द्वारे " हॉटेल धंद्याचा " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) असा निदेश देण्यात आल्यानंतर राज्य शासनाला किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि कोणत्याही वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करून किंवा सर्व हॉटेलचालकांचे लक्ष नोटिशीकडे वेधण्यास त्याच्या किंवा त्यांच्या मते जी रीत अधिक चांगली असेल अशा अन्य रीतीने ज्यासंबंधी आकडेवारीगोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी अशा नोटिशीत नमूद करण्यात येईल अशी माहिती किंवा विवरणे सादर करण्यास सर्व हॉटेलचालकांना किंवा हॉटेलचालकांच्या कोणत्याही वर्गास सांगता येईल, ज्या नमुन्यात व ज्या व्यक्तींकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे अशी माहिती किंवा विवरणे पाठवावयाची असतील तो नमुना, व त्या व्यक्ती किंवा ते प्राधिकारी, यामध्ये जो तपशील असावयास पाहिजे तो तपशील, आणि ज्या कालांतराने अशी माहिती किंवा विवरणे पुरवावयाची असतील ते कालांतर विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**३३.** (१) जर न्यायालयापुढे चालू असलेल्या कार्यवाहीत उपस्थित झालेल्या प्रश्नाव्यतिरिक्त किंवा आयुक्ताने कलम १३ किंवा १५ अन्वये हॉटेलचालकावर नोटीस बजावल्यावर आकारणी किंवा फेरआकारणी करण्यास सुरुवात करण्यापूर्वी, या अधिनियमाचे अर्थविवरण, त्याच्या कोणत्याही तरतुदींची व्याप्ती यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवेल तर, आयुक्त अशा प्रश्नांचा निर्णय करणारा आदेश देईल. विवादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करणे.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी, आयुक्ताने, यथास्थिति, कलम १३ किंवा १५ अन्वये हॉटेलचालकावर कोणतीही नोटीस बजावली असेल तर, आयुक्ताने हॉटेलचालकावरील आकारणीस किंवा फेरआकारणीस सुरुवात केली आहे असे मानले जाईल.

(२) अशा निर्णयामुळे कोणत्याही व्यक्तीच्या या अधिनियमाखालील अशा निर्णयापूर्वीच्या दायित्वास बाध येणार नाही असा निदेश आयुक्तास देता येईल.

(३) या अधिनियमान्वये आधीच दिलेल्या कोणत्याही आदेशातून असा कोणताही प्रश्न उपस्थित होत असेल तर, या कलमान्वये निर्णय करण्यासाठी असा कोणताही प्रश्न दाखल करून घेतला जाणार नाही ; परंतु, अशा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलात किंवा पुनरीक्षणाच्या अर्जात असा प्रश्न उपस्थित करता येईल.

**३४.** (१) आयुक्तास या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्याची कामे पार पाडताना, खालील प्रयोजनांसाठी, दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील :— आयुक्ताचे अधिकार.

(अ) प्रतिज्ञालेखावरून तथ्ये सिद्ध करणे;

(ब) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर किंवा दृढ कथनावर तिची तपासणी करणे;

(क) कागदपत्र दाखल करण्यास भाग पाडणे; आणि

(ड) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी करावयाच्या कोणत्याही प्रतिज्ञालेखाच्याबाबतीत, आयुक्ताने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास जबानीदारास शपथ देता येईल.

(३) त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाध न आणता जिला विवक्षित ठिकाणी व विवक्षित वेळी एकतर साक्ष देण्यासाठी किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याबद्दल जिच्या नावे आयुक्ताने समन्स काढले असेल अशा व्यक्तीने त्याठिकाणी व त्यावेळी, उपस्थित राहण्याचे किंवा कागदपत्रे सादर करण्याचे हेतुपूर्वक टाळल्यास आयुक्ताला, त्याला योग्य वाटेल असा पाचशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतका दंड त्या व्यक्तीवर लादता येईल; व अशा रीतीने लादण्यात आलेला दंड, कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल :

परंतु, असा कोणताही दंड लादण्यापूर्वी, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) आयुक्ताने जिच्या नावे समन्स काढले असेल त्या व्यक्तीने कोणतीही कागदपत्रे सादर केली असतील व कोणत्याही हॉटेलचालकाने त्याच्याकडून येणे असलेला कोणताही कर देण्याची टाळाटाळ केली आहे किंवा तो असा कोणताही कर देण्यात टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करीत असून सादर करण्यात आलेली कागदपत्रे अशा हॉटेलचालकाविरुद्ध दावा दाखल करण्यासाठी आवश्यक आहेत असे आयुक्तास सकारण वाटले तर, आयुक्तास त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करून ती कागदपत्रे पावती देऊन ताब्यात घेता येतील व खटला भरण्यासाठी किंवा या अधिनियमाखालील कामकाजाच्या संबंधात ती आवश्यक असतील तोपर्यंत ठेवून घेता येतील.

विवक्षित कार्यवाहीस रोध.

**३५.** या अधिनियमामध्ये अन्यत्र जी तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार केलेल्या नियमांन्वये आयुक्ताने किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने केलेल्या कोणत्याही आकारणीबाबत किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाबाबत कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही आणि कलम ३६ मध्ये जी तरतूद करण्यात आली असेल त्याच्याव्यतिरिक्त अशा कोणत्याही आकारणीविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करता येणार नाही.

अपिले.

**३६.** (१) कलम ३७ मध्ये उल्लेखिलेला आदेश नसेल अशा, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार केलेल्या नियमान्वये दिलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरुद्ध—

(अ) ऐषआराम कर अधिकाऱ्याने किंवा त्याच्या हाताखालील अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने आदेश दिला असेल तर, सहायक आयुक्ताकडे;

(ब) सहायक आयुक्ताने आदेश दिला असेल तर, उप आयुक्ताकडे;

(क) उप आयुक्ताने आदेश दिला असेल तर अपर आयुक्ताकडे किंवा आयुक्ताकडे;

अपील दाखल करता येईल.

(२) सहायक आयुक्ताने किंवा उप आयुक्ताने अपिलावर दिलेल्या आदेशाच्या बाबतीत दुसरे अपील आयुक्ताकडे दाखल करण्यात येईल.

(३) या कलमान्वये अपिलात दिलेला प्रत्येक आदेश कलम ३८ आणि ४१ यांच्या तरतुदींना अधीनराहून, अंतिम असेल.

(४) कलम ४० च्या तरतुदींना अधीनराहून, ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे असेल तो आदेश कळवल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात आले नसेल तर असे कोणतेही अपील दाखल करून घेण्यात येणार नाही.

(५) व्याजासह किंवा व्याजाशिवाय किंवा शास्तीसह किंवा शास्तीशिवाय आकारणीच्या आदेशाविरुद्ध किंवा व्याज आकारण्याच्या किंवा शास्ती लादण्याच्या किंवा दोन्ही लादण्याच्या आदेशाविरुद्ध किंवा हॉटेलचालकाने वसूल केलेला कोणताही कर जप्त करण्याचा निदेश देणाऱ्या आदेशाविरुद्ध केलेले कोणतेही अपील, ज्याबाबत असे अपील केले असेल अशा व्याजासह किंवा व्याजाशिवाय किंवा दंडासह किंवा दंडाशिवाय कराची रक्कम दिल्याचा, किंवा यथास्थिति, व्याजाची किंवा शास्तीची रक्कम किंवा दोन्ही रकमा दिल्याचा किंवा जप्त केलेली रक्कम दिल्याचा समाधानकारक पुरावा अशा अपीलासोबत दिल्याशिवाय सर्वसाधारणपणे अपील प्राधिकारी दाखल करून घेणार नाही :

परंतु, अपील प्राधिकाऱ्यास त्यास योग्य वाटल्यास कारणे लेखी नमूद करून—

(अ) व्याजासह किंवा शास्तीसह (कोणतीही असल्यास) कराची रक्कम, किंवा यथास्थिति व्याजाची किंवा दंडाची किंवा दोन्हीची रक्कम आणि जप्त केलेली रक्कम न भरता तो निदेश देईल तितक्या रकमेसाठी अपीलकर्त्याने विहित केलेल्या रीतीने प्रतिभूती दिल्यावर, किंवा

(ब) कराच्या व्याजाच्या किंवा दंडाच्या किंवा जप्त केलेल्या रकमेपैकी न दिलेल्या रकमेकरिता प्रतिभूतीसह किंवा प्रतिभूतीशिवाय तो निदेश देईल अशी कमी रक्कम, भरल्याचा पुरावा सादर केल्यावर अशा आदेशाविरुद्ध केलेले अपील दाखल करून घेता येईल.

(६) विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांना अधीनराहून प्रत्येक अपील प्राधिकाऱ्यास (पहिल्या व दुसऱ्या या दोन्ही अपिलांच्याबाबतीत) पुढील अधिकार असतील :—

(अ) आकारणी आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत उक्त प्राधिकाऱ्यास आकारणी कायम करता येईल, कमी करता येईल, वाढवता येईल किंवा विलोपित करता येईल किंवा त्यास आकारणी रद्द करता येईल, त्याने दिलेल्या निदेशानुसार आणि आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर त्याला नवी आकारणी करण्यासाठी ते प्रकरण पुन्हा आकारणी प्राधिकाऱ्याकडे पाठवता येईल, आणि त्यानंतर आकारणी प्राधिकारी अशा नवीन आकारणी करण्याच्या कामास आरंभ करून आवश्यक असेल त्याबाबतीत अशा नवी आकारणीच्या आधारे देय असलेली कराची रक्कम निश्चित करील;

(ब) व्याज किंवा शास्ती लादणाऱ्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये अपील प्राधिकाऱ्यास असा आदेश कायम करता येईल किंवा तो रद्द करता येईल किंवा व्याज किंवा शास्ती वाढवण्याकरिता किंवा ती कमी करण्याकरिता त्यात बदल करता येईल;

(क) अन्य कोणत्याही प्रकरणात अपील प्राधिकाऱ्यास त्यास न्याय्य व योग्य वाटेल असे आदेश अपिलामध्ये देता येतील:

परंतु, अपील प्राधिकारी अपीलदारास अशी वाढ करण्याविरुद्ध कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज आकारणीत किंवा व्याजात किंवा शास्तीत वाढ करणार नाही.

**३७.** (१) या अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या ज्या नोटिशीद्वारे एखाद्या हॉटेलचालकास आकारणीसाठी फर्माविण्यात आले असेल किंवा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल खटला का भरण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्यास एखाद्या हॉटेलचालकास सागण्यात आले असेल त्या नोटिशीविरुद्ध किंवा या अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीअन्वये काढण्यात आलेल्या नोटिशीविरुद्ध, किंवा — अपीलयोग्य नसलेले आदेश.

(२) हिशेबाच्या वह्या, नोंदवह्या व अन्य कागदपत्रे जप्त करण्यासंबंधीच्या किंवा ती ठेवून घेण्यासंबंधीच्या आदेशाविरुद्ध, किंवा

(३) या अधिनियमान्वये खटला भरण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशाविरुद्ध, किंवा

(४) कलम ४७ अन्वये कोणत्याही कार्यवाहीचे हस्तांतरण करणाऱ्या आदेशाविरुद्ध,

कोणतेही अपील करता येणार नाही.

**३८.** (१) याबाबत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांना अधीनराहून आयुक्तास, त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने या अधिनियमाखाली किंवा तदन्वये केलेल्या नियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे (अपिलात दिलेला आदेश धरून) अभिलेख स्वतः होऊन मागवता येतील व त्यांची तपासणी करता येईल आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल : — पुनरीक्षण.

परंतु, ज्या आदेशाचे पुनरीक्षण व्हावे असा प्रयत्न केला गेला असेल तो आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर आयुक्त या पोटकलमान्वये करपात्र व्यक्तीवर कोणतीही नोटीस

बजावणार नाही आणि अशा दिनांकापासून पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर या खंडाअन्वये पुनरीक्षणात कोणताही आदेश देणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेल्या आदेशामुळे कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होत असेल तर अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, या कलमान्वये असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

अपिलासाठी करण्यात आलेले अर्ज आणि अन्य विवक्षित अर्ज यांवरील न्यायालय फी.

**३९.** मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३६ अन्वये केलेल्या अपिलावर विहित करण्यात येईल असा, शंभर रुपयापेक्षा अधिक नसेल अशा मूल्याचा न्यायालय फी मुद्रांक असला पाहिजे आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा ज्यासंबंधी तरतूद करण्यात आली नसेल असा इतर कोणताही अर्ज विहित प्रयोजनासाठी या अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल तेव्हा, त्यावर दोन रुपये मूल्याचा न्यायालय फी मुद्रांक असला पाहिजे. १९५९ चा मुंबई ३६.

मुदत मर्यादा अधिनियमाची कलमे ४, ५ व १२ लागू असणे.

**४०.** कलम, ३६ मध्ये नमूद केलेल्या मुदतीची संगणना करताना, मुदत मर्यादा अधिनियम,१९६३ याची कलमे ४, ५ आणि १२ यांच्या तरतुदी शक्य असतील तेथवर, लागू होतील. १९६३ चा मुंबई ३६.

चुकांची दुरुस्ती.

**४१.** (१) आयुक्तास, त्याने कोणताही आदेश दिल्याच्या दिनांकापासून २ वर्षांच्या आत केव्हाही, अभिलेखावरून उघड उघड दिसून येणारी कोणतीही चूक स्वतः होऊन दुरुस्त करता येईल, आणि अशा आदेशामुळे ज्या व्यक्तीस बाधा पोचली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने निदर्शनास आणलेली अशी कोणतीही चूक त्याच कालावधीत दुरुस्त करील:

परंतु, अशा दुरुस्तीमुळे कर वाढत असेल तर, आयुक्ताने, अशा व्यक्तीस आपण तसे करण्याचा आपला इरादा असल्याची लेखी नोटीस दिल्याशिवाय आणि अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशी कोणतीही दुरुस्ती करता कामा नये.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदी, आयुक्ताने चुकीची दुरुस्ती करण्यास त्या ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे कलम ३६ अन्वये अपील प्राधिकाऱ्याने चुकीची दुरुस्ती करण्यासही लागू होतील.

(३) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा व्याजाची किंवा शास्तीची रक्कम, किंवा जप्त करावयाची रक्कम कमी होत असेल तेव्हा, आयुक्त, अशा व्यक्तीस देय असलेली कोणतीही रक्कम विहित केलेल्या रीतीने परत करील.

(४) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा व्याजाची किंवा शास्तीची रक्कम किंवा जप्त करावयाची रक्कम वाढत असेल तेव्हा आयुक्त कलम १८ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अशा व्यक्तीकडून येणे असलेली रक्कम वसूल करील.

अपराध व शास्ती.

**४२.** (१) जी कोणतीही व्यक्ती बुद्धिपुरस्सर खोटे विवरण देईल, तिला अपराधसिद्धीनंतर---

(एक) खोटे विवरण खरे म्हणून स्वीकारले असते तर जी कराची रक्कम टाळता आली असती ती रक्कम १०,००० रुपयांपेक्षा अधिक असेल अशा बाबतीत सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षापर्यंत वाढविता येईल अशी सश्रम कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत वाढविता येईल अशी सश्रम कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(२) कलम २९ चे उल्लंघन करून जी कोणतीही व्यक्ती जमा झालेल्या रकमांचा जाणूनबुजून खोटा हिशेब ठेवील तिला, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत वाढवता येईल अशी सश्रम कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती––

(एक) या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेला कोणताही कर टाळण्याचा कोणत्याही प्रकारे बुद्धिपुरस्सर प्रयत्न करील, किंवा

(दोन) या अधिनियमाखालील कोणताही कर किंवा कोणत्याही दंडाची रक्कम किंवा व्याज टाळण्याचा कोणत्याही प्रकारे, बुद्धिपुरस्सर प्रयत्न करील,

तिला अपराधसिद्धीनंतर––

(अ) एखाद्या वर्षाच्या कालावधीतील अंतर्भूत असलेली रक्कम ५०,००० रुपयांहून जास्त असेल त्या बाबतीत सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतू तीन वर्षापर्यंत वाढवता येईल अशी सश्रम कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल;

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, तीन वर्षापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत वाढवता येईल अशी सश्रम करावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(४) जी कोणतीही व्यक्ती पोटकलमे (१) ते (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही कृत्य करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला, अपराधसिद्धीनंतर तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत वाढवता येईल अशी सश्रम कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(५) जी कोणतीही व्यक्ती––

(अ) कलम ८ चे बुद्धिपुरस्सर उल्लंघन करून, नोंदणी न करता आपला धंदा चालू ठेवील, किंवा

(ब) कलम १० अन्वये आवश्यक असलेली कोणतीही माहिती देण्यास पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(क) पुरेशा कारणाशिवाय कलम १२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणतेही विवरण विहित केलेल्या दिनांकास व विहित रीतीने सादर करण्यात कसूर करील, किंवा

(ड) वाजवी कारणाशिवाय, कलम २७ च्या तरतुदींचे उल्लंघन करील, किंवा

(ई) पुरेशा कारणाशिवाय कलम २८ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बिल किंवा रोखीचे टिपण देण्यात कसूर करील, किंवा

(फ) कलम २९ अन्वये कोणतेही हिशेब किंवा अभिलेख ठेवण्याबाबत तिला निदेश दिला असता, अशा निदेशानुसार ते ठेवण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ग) कलम ३० अन्वये तिला ज्या आवश्यक गोष्टीची पूर्तता करण्यास भाग पाडण्यात आले असेल अशा कोणत्याही आवश्यक गोष्टीचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ह) कलम ३० अन्वये तपास, झडती किंवा जप्ती करणाऱ्या अधिकाऱ्यास स्वतः होऊन अडथळा आणील, तिला, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत वाढवता येईल अशी कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

(६) जी व्यक्ती पोटकलमे (१) ते (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृत्ये करील आणि या पोटकलमांच्या कोणत्याही तरतुदीअन्वये अपराध करण्याचे तिने चालू ठेवले असेल त्या बाबतीत तिला अपराधसिद्धीनंतर, या कलमात तरतूद केलेल्या शिक्षांव्यतिरिक्त आणखी, अपराध चालू असलेल्या कालावधीत दर दिवसाला शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल अशी दंडाची शिक्षा होईल.

(७) पोटकलमे (१) ते (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या वर्षाच्या कालावधीत टाळलेली किंवा टाळण्याचा प्रयत्न केलेली कराची रक्कम २०० रुपयांहून कमी असेल तर त्या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या कृत्यांसाठी कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्यात येणार नाही.

(८) ज्या व्यक्तीस कलम ३२ अन्वये कोणतीही माहिती किंवा विवरण पुरवणे आवश्यक असेल अशी कोणतीही व्यक्ती,—

(अ) अशी माहिती किंवा विवरण पुरवण्यात हेतुपुरस्सर नकार देईल किंवा कायदेशीर सबबीशिवाय ते पुरविण्यात हयगय करील, किंवा

(ब) जी माहिती किंवा विवरण खोटे आहे असे तिला माहीत असेल अशी माहिती किंवा विवरण हेतुपुरस्सर पुरवील किंवा पुरवण्याची व्यवस्था करील, तर त्या व्यक्तीस सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि अपराध करणे चालू राहील त्या बाबतीत, असा अपराध करणे चालू असेल त्या कालावधीत पहिल्या दिवसानंतर प्रत्येक दिवसास आणखी दहा रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(९) कलम ३२ अन्वये आकडेवारी गोळा करण्याचे काम करणारी कोणतीही व्यक्ती, त्या कलमान्वये दिलेली कोणतीही माहिती किंवा दिलेल्या कोणत्याही विवरणातील आशय, त्या कलमान्वये तिचे कर्तव्य
१८६० बजावताना असेल त्याव्यतिरिक्त किंवा या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहितेखालील अपराधाबद्दल
चा ४५. खटला भरण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्याव्यतिरिक्त, हेतुपुरस्सर उघड करील, तर तिला सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर, सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची किंवा त्या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(१०) कलम ४३ च्या पोटकलम (२) मध्ये तरतूद केलेल्या बाबी खेरीजकरून त्या कलमाच्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही तपशील, शासनाचा कोणताही सेवक उघड करील तर, त्यास सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर सहा महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(११) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये ज्या गोष्टींच्या बाबतीत आयुक्ताकडून शास्ती लादण्यात आली असेल त्याच गोष्टींच्या संबंधातील अपराधाबद्दल, या अधिनियमान्वये कोणताही खटला भरता येणार नाही.

कोणत्याही लोकसेवकाने माहिती उघड करणे.

**४३.** (१) या अधिनियमानुसार दिलेल्या कोणत्याही विवरणपत्रात, पुरवलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही हिशेबातील किंवा कागदपत्रातील सर्व तपशील, किंवा (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाहीव्यतिरिक्त) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या पुराव्याच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील, किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या कोणत्याही आकारणीच्या कार्यवाहीच्या किंवा मागणीच्या वसुलीसंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील पोटकलम (२) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, गोपनीय समजण्यात येईल.

(२) या कलमातील कोणताही मजकूर, पुढील प्रकारचा तपशील उघड करण्यास लागू होणार नाही.

(अ) भारतीय दंड संहिता किंवा भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ अन्वये, किंवा या १८६०
अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये कोणताही खटला चा ४५, १९४७
भरण्याच्या प्रयोजनासाठी असे कोणतेही विवरणपत्र, विवरण, हिशेब, कागदपत्र, पुरावा, प्रतिज्ञालेख किंवा चा २.
जबानी यांच्याबाबतचा असा कोणताही तपशील ; किंवा

(ब) या अधिनियमाचा उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाकडे किंवा या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे असलेला असा कोणताही तपशील ; किंवा

(क) कोणतीही मागणी वसूल करण्यासाठी एखादी नोटीस बजावण्याकरिता या अधिनियमान्वये कोणतीही आदेशिका कायदेशीर रीतीने बजावताना तपशील उघड करावा लागत असेल तर, असा तपशील ; किंवा

(ड) ज्या कोणत्याही दाव्यात सरकार पक्षकार असेल, त्या दाव्यात दिवाणी न्यायालयास उघड करावयाचा या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी संबंधित असा कोणताही तपशील ; किंवा

(ई) या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या कराच्या जमा रकमांची किंवा परताव्याच्या रकमांची लेखापरीक्षा करण्याकरिता नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास उघड करावयाचा असा कोणताही तपशील ; किंवा

(फ) सरकारी अधिकाऱ्याच्या वर्तणुकीसंबंधी करावयाच्या चौकशीशी संबंधित असलेल्या लोकसेवक (चौकशी) अधिनियम, १८५० अन्वये आयुक्तांनी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना, किंवा अशी चौकशी करण्यासाठी अन्य रीतीने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा संविधानान्वये स्थापन केलेल्या लोकसेवा आयोगाला अशा चौकशीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीच्या संबंधात आपली कर्तव्ये पार पाडत असताना जो तपशील उघड करण्यात येईल असा कोणताही तपशील ; किंवा

१८५० चा ३७.

(ग) केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला कोणताही कर बसवणे किंवा त्याने बसवलेला कोणताही कर किंवा कोणतेही शुल्क वसूल करणे शक्य होण्यासाठी केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला आवश्यक असतील अशा गोष्टी ; किंवा

(ह) मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, किंवा भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ अन्वये एखादा लोकसेवक अपुरा मुद्रांक लावलेला दस्तऐवज अवरूद्ध करण्यासाठी कायदेशीररीत्या आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना त्याच्याकडून जो तपशील उघड होईल असा कोणताही तपशील ; किंवा

१९५८ चा मुंबई ६०. १८९९ चा २.

(आय) विधि व्यवसायी, कर व्यवसायी किंवा सनदी लेखापाल यांच्याविरुद्ध या अधिनियमाखालील कार्यवाहीच्या संबंधातील गैरवर्तणुकीच्या आरोपाच्या कोणत्याही चौकशीशी संबंधित असलेला जो तपशील, यथास्थिति, विधि व्यवसायी, कर व्यवसायी किंवा सनदी लेखापाल म्हणून व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार दिलेल्या प्राधिकाऱ्यास उघड करण्यात येईल असा कोणताही तपशील ; किंवा

(ज) संचालक, अर्थ व सांख्यिकी केंद्र, यास किंवा त्यांच्या हाताखालील काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कलम ३२ अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना कोणत्याही जमा रकमांवरील किंवा त्यांच्या विशिष्ट वर्गावरील कराचा भार तपशीलवार तयार करणे शक्य व्हावे म्हणून त्या संचालकास किंवा अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना आवश्यक असेल असा कोणताही तपशील.

(३) कलम ३२ च्या प्रयोजनांसाठी कोणत्याही गोष्टीसंबंधी कोणत्याही व्यक्तिगत विवरणात दिलेली माहिती आणि कोणत्याही व्यक्तिगत विवरणाचा कोणताही भाग, त्यावेळी जो कोणी मालक असेल किंवा त्या मालकाचा जो कोणी प्राधिकृत अभिकर्ता असेल त्याच्या लेखी पूर्वसंमतीशवाय कोणताही तपशील एखाद्या विशिष्ट हॉटेल मालकाच्या संदर्भातील आहे असे ओळखणे शक्य होईल अशा रीतीने प्रसिद्ध करता कामा नये आणि अशी कोणतीही माहिती या अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

(४) या अधिनियमान्वये किंवा भारतीय दंड संहितेअन्वये खटल्याच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त, कलम ३२ अन्वये आकडेवारी गोळा करण्याचे किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम जी व्यक्ती करीत नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, त्या कलमात उल्लेखिलेली कोणतीही माहिती किंवा कोणतेही एखादे विवरण पाहण्यास किंवा पाहण्यास मिळण्यास परवानगी देण्यात येणार नाही. १८६० चा ४५.

(५) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही हॉटेल चालक किंवा इतर व्यक्ती यांची नावे आणि असे हॉटेल चालक व व्यक्ती याबाबत या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित इतर कोणताही तपशील लोकहितार्थ प्रसिद्ध करणे किंवा तो उघड करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर त्यास अशी नावे आणि तपशील त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध करता येईल किंवा उघड करता येईल, किंवा प्रसिद्ध किंवा उघड करण्याची व्यवस्था करता येईल.

(६) या अधिनियमान्वये बसवलेला कोणताही कर किंवा व्याज किंवा लादलेला दंड किंवा कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित कोणत्याही अपराधाबद्दलची अपराधसिद्धी याबद्दलची या कलमाखालील कोणतीही प्रसिद्धी किंवा प्रकटन, समुचित अपील प्राधिकरणाकडे अपील केले नसेल तर अपील करण्याची ही मुदत संपेपर्यंत किंवा अपील केले असल्यास ते निकालात निघाल्याशिवाय, केले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—भागीदारी संस्था, कंपनी किंवा अन्य व्यक्तीसंघ यांच्याबाबतीत भागीदारी संस्थेचे भागीदार, कंपनीचे संचालक, व्यवस्थापन एजंट सचिव, कोषपाल किंवा व्यवस्थापक किंवा यथास्थिति संघाचे सदस्य यांची नावेदेखील राज्य शासनाच्या मते परिस्थितीनुसार तसे समर्थनीय असेल तर प्रसिद्ध किंवा उघड करता येतील.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**४४.** (१) या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केला असेल तर, असा अपराध घडण्याच्या वेळी कंपनीचा धंदा चालवण्यासाठी कंपनीचा ताबा ज्या व्यक्तीकडे होता आणि कंपनीचा धंदा चालवण्यास जी व्यक्ती जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि अशी व्यक्ती व कंपनी, त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असतील :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे ती व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी—

(अ) " कंपनी " म्हणजे निगम निकाय आणि यात भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तीच्या अन्य संघांचा समावेश होतो ; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " म्हणजे भागीदारी संस्थेतील भागीदार.

अपराधांचे अन्वेषण.

**४५.** (१) विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, आयुक्ताला या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या सर्व किंवा कोणत्याही अपराधांचे अन्वेषण करण्यास सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही

विशिष्ट प्रकरणाच्या संबंधात किंवा प्रकरणांच्या वर्गाच्या संबंधात त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

१९७४ चा २. (२) अशा रीतीने प्राधिकृत केलेला प्रत्येक अधिकारी, अशा अन्वेषणाचे काम चालवताना पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला दखलपात्र अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील.

**४६.** (१) आयुक्ताला, कलम ४२ अन्वये किंवा या अधिनियमाअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाअन्वये, शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, असा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अपराधाची तडजोड म्हणून दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम किंवा जर आरोप ठेवण्यात आला असेल तर तो अपराध कलम ४२, पोटकलम (१), (२), (३), (४) किंवा पोटकलम (५) चे खंड (अ), (ब), (क), (ड), (ग) किंवा (ह) खालील अपराध असेल तेव्हा उक्त अपराधाचा ज्या जमा रकमेशी किंवा उलाढालीशी संबंध असेल त्या जमा रकमेवर किंवा उलाढालीवर कराची जितकी रक्कम द्यावी लागली असती त्या रकमेच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम—यापैकी जी रक्कम अधिक असेल ती रक्कम—स्वीकारता येईल. अपराध आपसात मिटविणे.

(२) पोटकलम (१) अन्वये आयुक्ताकडून ठरवण्यात येईल अशी रक्कम दिल्यानंतर त्याच अपराधाच्या संबंधात त्या आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कारवाई करता येणार नाही.

**४७.** आयुक्तास, जेथे जेथे तसे करणे शक्य असेल तेथे तेथे पक्षकारांना त्या प्रकरणात आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याने तसे करण्याबद्दलच्या आपल्या कारणांची नोंद केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीखालील कोणतीही कार्यवाही किंवा कार्यवाहींचा वर्ग, स्वतःकडून कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करता येईल आणि त्याचप्रमाणे त्यास, अशी कोणतीही कार्यवाही (कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेली किंवा या कलमान्वये अगोदरच हस्तांतरित केलेली कार्यवाही धरून) कोणत्याही अधिकाऱ्याकडून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा स्वतःकडे हस्तांतरित करून घेता येईल : कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार.

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, जेव्हा असे हस्तांतरण कोणत्याही अधिकाऱ्याकडून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे करावयाचे असेल आणि दोन्ही अधिकाऱ्यांची कार्यालये एकाच शहरात, वस्तीत किंवा ठिकाणी असतील तेव्हा, अशी कोणतीही संधी देणे आवश्यक असल्याचे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये एखाद्या कार्यवाहीत दिलेल्या कोणत्याही आदेशामध्ये ज्याचे नाव विनिर्दिष्ट केलेले असेल अशा कोणत्याही हॉटेलचालकाच्या संबंधात, " कार्यवाही " या शब्दाचा अर्थ अशा आदेशाच्या दिनांकास ज्या प्रलंबित असतील किंवा अशा दिनांकास किंवा दिनांकापूर्वी पूर्ण झालेल्या असतील अशा कोणत्याही वर्षाच्या संबंधातील या अधिनियमाखालील सर्व कार्यवाह्या असा होतो आणि त्यामध्ये, अशा हॉटेल चालकासंबंधी कोणत्याही वर्षाच्या संबंधात, अशा आदेशाच्या दिनांकानंतर सुरू केल्या जातील अशा, या अधिनियमाखालील सर्व कार्यवाह्यांचा समावेश होतो.

**४८.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे हजर राहण्याचा हक्क असलेल्या किंवा हजर राहणे आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीला— कार्यवाहीत कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे हजर राहणे.

(अ) तिचा नातेवाईक असलेल्या किंवा तिने नियमितपणे नोकरीस ठेवलेल्या व्यक्तीमार्फत, किंवा

(ब) पोटकलम (२) अन्वये किंवा त्यानुसार ज्याला अनर्ह ठरवण्यात आलेले नाही अशा विधि व्यवसायीमार्फत, सनदी लेखापालामार्फत किंवा परिव्यय लेखापालामार्फत किंवा

(क) विहित केलेल्या अर्हता धारण करणाऱ्या आणि त्याबाबतीत आयुक्त ठेवील त्या यादीत नोंद केलेल्या व पोटकलम (२) अन्वये किंवा त्यानुसार अनर्ह ठरवण्यात आलेले नाही अशा विक्रीकर व्यवसायीमार्फत, अशा प्राधिकाऱ्यापुढे हजर राहता येईल.

मात्र असा नातेवाईक, नोकरीस ठेवलेली व्यक्ती, विधि व्यवसायी, सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल किंवा कर व्यवसायी याला अशा व्यक्तीने, विहित नमुन्यात प्राधिकृत केलेले असेल तर अशा प्राधिकारपत्रात अशा कार्यवाह्यांमध्ये अशा व्यक्तीच्या वतीने काम करण्याच्या प्राधिकाराचा समावेश करता येईल.

(२) उप आयुक्ताला लेखी आदेशाद्वारे व त्यात कारणे नमूद करून---

(एक) ज्याला शासकीय सेवेतून काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(दोन) जो विधि व्यवसायी, सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल असून तो जो व्यवसाय करीत असेल तो व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाबद्दल उपाययोजना करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्यास, जो या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधातील गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल, किंवा

(तीन) जो विक्री कर व्यवसायी असून अशा गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आयुक्तास आढळून आले असेल, अशा कोणत्याही विधि व्यवसायीस, सनदी लेखापालास, परिव्यय लेखापालकास किंवा कर व्यवसायीस अशा कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर हजर राहण्यास त्या आदेशात नमूद करण्यात आलेल्या कालावधीसाठी अनर्ह ठरवता येईल.

(३) कोणत्याही विशिष्ट व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय त्या व्यक्तीबाबत कोणताही अनर्हतेचा आदेश देण्यात येणार नाही.

(४) या कलमान्वये ज्या व्यक्तीविरूद्ध अनर्हतेचा कोणताही आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश कळवल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, असा आदेश रद्द करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(५) आयुक्ताचा आदेश तो दिल्यापासून एक महिन्यापर्यंत किंवा अपील करण्यात आले असेल तर उक्त अपिलाचा निकाल लागेपर्यंत अमलात येणार नाही.

(६) आयुक्ताला, कोणत्याही वेळी स्वाधिकारे किंवा याबाबतीत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर पोटकलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीविरूद्ध देण्यात आलेला कोणताही आदेश रद्द करता येईल व त्यानंतर अशी व्यक्ती अनर्ह असण्याचे बंद होईल.

कलम ७ अन्वये नेमलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे.

**४९.** आयुक्त व कलम ७ अन्वये नेमलेले सर्व अधिकारी व व्यक्ती या भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

क्षतिपूर्ती.

**५०.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**५१.** [१][(१) या अधिनियमाअन्वये नियम तयार करण्याचे अधिकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासनाने वापरण्यायोग्य असतील.

(२) या अधिनियमान्वये अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम तयार करण्याच्या कोणत्याही अधिकारास हानी न पोहचवता, राज्य शासनाला सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम तयार करता येतील; आणि अशा नियमांमध्ये या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी शुल्क बसवण्याकरिता असलेल्या नियमांचा समावेश करता येईल.]

---

१. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या कलम २४ द्वारे पोटकलमे (१) व (२) याऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

(३) कोणतेही नियम करताना, त्यांचा भंग केल्यास दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडाची आणि जेव्हा अपराध चालू राहिल तेव्हा अपराध चालू राहिल्याच्या मुदतीत प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडाची शिक्षा होईल असा निदेश राज्य शासनाला देता येईल.

(४) या कलमान्वये केलेले नियम आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील :

परंतु, तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, त्यास या कलमान्वये करावयाचा कोणताही नियम आगाऊ प्रसिद्ध केल्याशिवाय करता येईल.

(५) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरफार करण्याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील, तर तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अमलात येईल किंवा यथास्थिति, तो नियम अमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याचे निरसन.

**५२.** याद्वारे, महाराष्ट्र (हॉटेल व निवासगृहे यामध्ये) पुरवण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९७४ हा निरसित करण्यात येत आहे.

व्यावृत्ती.

**५३.** (१) कलम ५२ अन्वये असे निरसन केले असले तरीही, त्यात उल्लेखिलेला कायदा आणि जो कोणताही कर बसवण्याचा, त्याच्या आकारणीचा, वसुलीचा, परताव्याचा किंवा कोणत्याही दंडाचा संबंध नेमलेल्या दिवसापूर्वीच्या कालावधीशी असेल असा कोणताही कर बसवण्याच्या, त्याची आकारणी करण्याच्या, ती वसूल करण्याच्या, त्याच्या परताव्याच्या किंवा कोणताही दंड लादण्याच्या प्रयोजनांसाठी किंवा उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबंध असलेल्या किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आणि त्या कायद्यान्वये केलेले व नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी अमलात असलेले सर्व नियम, विनियम, आदेश, अधिसूचना, नमुने व नोटिसा या अमलात असण्याचे चालू राहील.

१९०४ चा मुंबई १.

(२) पूर्ववर्ती पोटकलमातील तरतुदींना बाध येऊ न देता, आणि त्यांना अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम ७ हे, जणू अशा रीतीने निरसन केलेला कायदा हा त्या अधिनियमाच्या कलम ७ च्या अर्थानुसार अधिनियम होता असे समजून कलम ५२ मध्ये उल्लेखिलेल्या कायद्याचे निरसन करण्याच्या संबंधात लागू होईल.

[1][(३) महाराष्ट्र (हॉटेले व निवासगृहे यामध्ये) पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवावरील कर अधिनियम, १९७४ याच्या कोणत्याही तरतुदीमधील कोणताही अधिकारी, प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण याचा उल्लेख हा या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी अमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये नियुक्त केलेला किंवा घटित केलेला तदनुरुप अधिकारी, प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण असा लावण्यात येईल आणि असा तदनुरुप अधिकारी, प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण कोण असा प्रश्न निर्माण

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ३७ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

झाला तर त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल. उपरोक्त निरसित अधिनियमाखालील शास्तीसह कराच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी उक्त अधिकारी, प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण यांना या अधिनियमाखालील वसुलीची आणि वसुलीच्या विशेष प्रकाराच्या संबंधातील सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर, जणू काही उक्त निरसित अधिनियमान्वये देय असलेला कर हा या अधिनियमाखालील देय कर असल्याप्रमाणे करता येईल.]

अडचणी दूर करणे.

**५४.** या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण निर्माण झाली तर राज्य शासनाला अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी तरतूद राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, नियत दिवसापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर राज्य शासनाला असा आदेश काढता येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)
**प. ग. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.